**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**सर्व साधारण सभा**

सोमवार दि. २९.२.२०१६ रोजी दुपारी ०३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफि अहेमद | कदम गंगाबाई नारायणराव |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | पवळे उमेश देवराव |
| कोकाटे नागाबाई भूजंगराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| बियाणी प्रविण बालाप्रसाद | पांढरे स्नेहा सुधाकर |
| चव्हाण आनंद शंकरराव | फारुख अली खॉं इलियास खॉं |
| अंजूम बेगम शेख अफरोज | मुंढे शांता मोतीराम |
| आनेवार गंगासागर संदिप | भवरे किशोर दामोधर |
| कदम शीला सुनिल | कनकदंडें मोहिनी महेशराव |
| वाजेदा तबसुम अथअली खॉं | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकश |
| जाधव जयश्री आनंद | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| चव्हाण श्रध्दा सुशिल | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| जिंदम पार्वती व्यंकटेश | उमरेकर अशोक रावण |
| मुदिराज कमलाबाई रामस्वामी | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| रजिया बेगम अयुब खान | सलिमा बेगम नुरुल्लाखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख वैशाली मिलिंद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | सय्यदा इतरत फातेमा मजहुर हुसेन |
| गफारखान गुलाम महमंद खान | धबाळे गणपत गुणाजी |
| अनुजा अमितसिंह तेहरा | शर्मा पुष्पाताई राजेश |
| खेडकर ज्योती महेंद्र | नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ |
| राओत्रे संगिता पृथ्वीराज | गील सरजितसिघ पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | बिपाशा बेगम सय्यद वलिओध्दीन |
| अ.फसीया फिरदोस | अ.सत्तार अ.गफुर |
| आसिया बेगम अ. हबीब बागवान | स. शेर अली स.महेबुब अली |
| कुरेशी चॉंद पाशा खाजा | फारुख हुसेन कासिम साब |
| कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम | राखेवार सतिष शेषप्पा |
| चाऊस हसिना बेगम साबेर | अ.लतिफ अ.मजिद |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | ठाकूर अन्नपुर्णाबाई जम्मूसिंह |
| किशोर किशनलाल यादव | सोडी गुरुप्रितकौर दिलिपसिंघ |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक रमेशराव सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमूख मंगला देशमूमख | चिखलीकर संदिप सुभाषराव |
| प्रा.ललिता मुकूंदराव बोकारे | विनय विश्वांभरराव पाटील |
| जमदाडे करुणा भिमराव | घोगरे इंदूबाई शिवाजी |
| येवनकर विजय हिरांचद | कदम विश्वास बालाजी |
| अड.बन शाम वामनराव | काबरा रामनारायण रामदेव |
| अल केसरी हसन बिन उबेद | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर सौ.शैलजा किशोर स्वामी, या होत्या. तसेच श्री सुशील खोडवेकर, आयुक्त, श्री रमेश नानकराम होतवानी, अधिक्षक अभियंता, भारत स्वच्छता अभियांन, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त श्री प्रकाश येवले, प्र उपआयुक्त, श्री आर.एस.कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ.असिफ, प्रभारी मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री महमंद सादिक, मुख्य लेखाधिकारी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोग्य,श्री गिरीष कदम, का.अभियंता सा.बा.वि.श्री सुग्रीव अंधारे,का.अभियंता डॉ.श्री रईसोध्दीन, पशु वैद्यकिय अधिकारी, श्री अजितपाल संधू,नगरसचिव, श्री खुशाल कदम, नगररचनाकार, व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व इतर सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**(२)**

| | |
|---|---|
| | सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले. |
| **महापौर** | उपस्थित सर्व स. सदस्य, आयुक्त, अधिकारी कर्मचारी यांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामाकाजास सुरुवात करण्यात येते. |
| **सरजितसिंघ गिल** | महाराष्ट्र राज्यातील जलता दलाचे जेष्ठ समाजवादी नेते व माजी आमदार निहाल अहेमद यांचे कालच दुःखद निधन झालेले असल्यामूळे तसेच सियाचिन मध्ये हिमसख्यलन झाल्याने त्यात भारताचे १० जवान शहीद झाले असून त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. |
| **अ.सत्तार** | या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. |
| **बालाजी कल्याणकर** या | प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. |
| **महापौर** | जनता दलाचे जेष्ठ नेते व माजी आमदार निहाल अहेमद तसेच शहीद झालेल्या जवानाना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. |

**ठराव क्रं.१२७** **ठराव**

जनता दलाचे जेष्ठ समाजवादी नेते, माजीमंत्री, व मालेगाव महानगरपालिकेचे प्रथम महापौर निहाल अहेमद यांचे वृध्दपकाळाने दु:खद निधन झाले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते व त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दु:खात सहभागी होते.

**ठराव क्रं.१२८** **ठराव**

देशाचे सरक्षण करीत असतांना सियाचिन भागात हिमसख्यलन होवून त्यात महारारष्ट्र राज्यातील कर्नाटकातील कै.हनमंत अप्पा यांच्यासह १० भारतीय जवान शहीद झाले त्यांना ही नांवामनपा सर्वसाधारण सभा भावपूर्ण श्रध्दांजली व त्यांच्या कुटुंबियावर ओढावलेल्या दु:खात सहभागी होते.

**बालाजी कल्याणकर** पुरवणी विषय पत्रिका व मागील एक वर्षात झालेल्या सभेचे इतिवृत्त आम्हाला कालच मिळाले असल्यामूळे इतिवृत्त आम्ही पुर्ण वाचलेले नाही तसेच पुरवणी विषय पत्रिकेवर जवळ पास २३ विषय आहे त्यावर आम्हाला अभ्यास करण्यास वेळ मिळालेला नाही त्यामूळे पुरवणी विषय पत्रिका स्थगित करुन या पुरवणी विषयी पत्रीकेवर निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र महासभा बोलाविण्यात यावी. पुरवणी विषय पत्रिका आजच्या सभेत धेण्यात येत असेल तर आम्ही सभागृहाचे काम चालू देणार नाही .

**अ.सत्तार** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने बिएसयुपी योजने अंतर्गत नांदेड शहरातील गोरगरीब नागरीकांना अत्यंत कमी कालावधीत २० हजार घराचे बांधकाम पुर्ण केले म्हणून महाराष्ट्र शासनाने व संबंधित खात्याचे केंद्रीय मंत्री महोदयानी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त श्री सुशिल खोडवेकर व महानगरालिकेतील अभियंत्यांचा सत्कार करुन त्यांचा गौरव केला ही महानगरपालिकेच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे. त्यामूळे श्री सुशिल खोडवेकर व महानगरालिकेतील अभियंत्यांचे अभिनंदन करण्यात यावे त्यांचा सत्कार करण्यात यावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आयुक्त श्री सुशिल खोडवेकरजी यांनी व त्यांचे टिमने चांगले काम केले त्याबदल महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केलेला आहे, त्याचे अभिनंदनाचे करण्यात यावे. व त्यांचा सत्कार करण्यात यावा.

**सरजितसिंघ गिल** श्री अ.सत्तार यांनी मांडलेल्या अभिनंदनाच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**स.शेर अली** श्री अ.सत्तार यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास सर्व एमआयएम पक्षाच्या सदस्याचे अनुमोदन आहे. आयुक्त साहेबांचा अभिनंदन करुन त्यांचा सत्कार करण्यात यावा.

**बालाजी कल्याणकर** शिवसेना पक्षाच्या नगरसेवकाचेही या प्रस्तावास अनुमोदन आहे.आयुक्त श्री सुशील खोडवेकर साहेबांचे आम्ही स्वागत करतो.

**दिपकसिंह रावत** आयुक्त श्री सुशिल खोडवेकर साहेबांनी चांगली कामे केल्यामूळे महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केला म्हणून सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनी त्यांचे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आम्ही ही आयुक्त श्री सुशिल खोडवेकर साहेबांचे शब्द सुमनाने स्वागत करतो.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री जी.पी. देशमूख पतंगे हे प्रदिर्घ सेवेनंतर आज सेवानिवृत्त होत असल्यामूळे त्यांचाही सत्कार करण्यात यावा.

**महापौर** श्री अ.सत्तार यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो तसेच आयुक्तांचे व मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री जी.पी.देशमूख पंतगे यांचे पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात येतो.

**(महापौरांनी आयुक्त श्री सुशिल खोडवेकर मुख्य स्वच्छत निरिक्षक श्री जी.पी.देशमूख यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला)**

**ठराव क्रं.१२९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने बिएसयुपी योजने अंतर्गत नियोजन करुन शहरातील गोर गरीब नागरीकांना राहण्यासाठी जवळपास २० हजार घराचे चांगल्या गुणवत्तेत अत्यंत कमी कालावधीत बांधकाम करुन दिले त्याच बरोबर मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध्द करुन दिल्या बध्दल महाराष्ट्र शासनाने आयुक्त श्री सुशिल खोडवेकर यांचे व नांवामनपाकेतील बिएसयुपी विभागातील अभियंत्यांचा सत्कार करुन यथोचित गौरव केला त्याबध्दल त्यांचे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते हार्दीक अभिनंदन करते.

**(३)**

**आनंद चव्हाण** पुरवणी विषय पत्रिकेवर विषय क्र. १८ वर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीच्या बाजूस असलेल्या जिल्हा परिषदेच्या जागेवर शासनाच्या वतीने बांधण्यात आलेल्या इमारतीत चालू असलेला बाहयरुग्ण दवाखाना विष्णूपूरी भागात स्थलांतरीत करण्यात आलेला असल्यामूळे बाहयरुग्ण इमारत बंद असल्याने व ही जागा गुरुव्दारा बोर्डाचे मालकीची नसल्यामूळे भविष्याकाळात महानगरपालिकेच्या वाचनालयाकरीता व इतर विभागाच्या विस्तारासाठी बाहयरुग्णालयाची इमारत महानगरपालिकेने शासनाकडून हस्तांतरीत करावी अशी माझी इच्छा होती म्हणून मी बाहयरुग्णालयाची इमारत महानगरपालिकेने हस्तांतरीत करावी असा प्रस्ताव दिला परंतू या प्रस्तावामूळें गुरुव्दारा बोर्डाचे स. सदस्यांचा व शिख बांधवाचा गैर समज झालेला आहे ते मला प्रत्यक्ष भेटून त्यांनी तशी नाराजी व्यक्त केली त्यामूळे मी माझा पुरवणी विषय पत्रिकेवर विषय क्र.१८ हा परत घेत आहे त्यावर चर्चा करण्यात येवू नये.

**बालाजी कल्याणकर** आजच्या सभेची जी पुरवणी विषय पत्रिका काढण्यात आली ती खुप उशिरा काढण्यात आली असून काल सध्याकाळी मिळाल्यामूळे त्यावर स.सदस्यंना अभ्यास करण्यास वेळच मिळालेला नाही म्हणून ही पुंरवणी रध्द करण्यात यावी व या विषयाकरीता वेगळी स्वतंत्र सर्वसाधारण सभा बोलाविण्यात यावी.अशी विरोधी पक्षाची मागणी आहे. महापौर साहेब जर आजच्या सभेत पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय सभागृहासमोर मांडत असतील तर त्यास आमचा विरोध राहिल.

**सरजितसिंघ गिल** विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** बाहयरुग्णालयाची जागा हस्तातरीत करण्याच्या प्रस्तावात प्रिन्ट मिस्टेक झाली आहे.संबंधितांनी आपला प्रस्ताव परत घेतलेला आहे त्यामूळे याप्रस्तावावर चर्चा करण्यात येवू नये. विरोधी पक्षनेत्यांनी पुरवणी विषय पत्रीका उशिरा मिळाली त्यावर आम्हाला अभ्यास करण्यास वेळ मिळाला नाही म्हणून पुरवणी विषय पत्रिका स्थगित करण्याची मागणी केली आहे त्यानुसार पुरवणी विषयपत्रिका स्थगित करण्यात येते.

**अ.सत्तार अ.गफूर** प्रभाग क्र.५ मध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्यासाठी शासनाकडून रु. २.१० कोटीचा निधी मिळालेला असून महानगरपालिकेने आपला तेवढाच वाटा टाकण्याचा प्रस्ताव आहे. त्यामूळे पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय क्र. ७ ला मान्यता देण्यात यावी. उर्वरीत पुरवणी विषय पत्रिका स्थगित करण्यात यावी.

| | |
|---|---|
| **आनंद चव्हाण** | श्री अ. सत्तार यांनी पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय क्र.७ ला मान्यता देण्याचा जो प्रस्ताव मांडला आहे त्यास मान्यता देण्यात यावी. दि. ३०.११.२०१६ रोजी झालेल्या सभेत महाराष्ट्र शासनाने प्रभाग क्र. ५ मध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्यासाठी रु. २.१० कोटीचा निधी दिल्याबध्दल मी शासनाचे अभिनंदन करुन या प्रस्तावास सत्वर मान्यता देण्याची मागणी केली होती परंतु ते इतिवृत्तात आलेले नाही. प्रभाग क्र.५ मध्ये विकास कामाच्या प्रस्तावास सर्व स.सदस्यांनी मान्यता दिल्याबध्दल मी सर्वाचे आभार मानतो. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | प्रभाग क्र. ५ मध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्यासाठी रु. ४.२० कोटीच्या रक्कमेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी . |
| **सरजितसिंघ गिल** | श्री अ.सत्तार यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनूमोदन आहे. शासनाने प्रभाग क्र. ५ मध्ये विकास कामासाठी रु. २.१० कोटीचे अनुदान दिलेले असल्यामूळे शासन निधी परत जावू नये म्हणून पुरवणी विषय पत्रिकेवरील विषयास मान्यता देण्यात यावी.ठवरीत पुरवणी विषय पत्रिका स्थगित ठेवण्यात यावी. |
| **महापौर** | मूळ विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय क्र.७ सभागृहासमोर ठेवण्यात येईल. |
| **बालाजी कल्याणकर** | जगतज्योती महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविण्यासाठी जी जागा निश्चित करण्यात आलेली त्याच जागेत सदरचा पुतळा बसविण्यात यावा. जागेत बदल करण्यात येवू नये अशी आमची मागणी आहे. |
| **विनय पाटील** | या प्रस्तावास आमचे अनुमोदन आहे. |
| **आनंद चव्हाण** | शासनाने महानगरपालिकेडे हस्तातरीत केलेल्या गायरानच्या जागेत महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविण्याचे नियोजन आहे. शिवसेना व भाजपच्या नगरसेवकांनी या जागेवर पुतळया बसविण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळविण्याचा प्रयत्न करावा. |
| **अ.सत्तार** | यापुर्वी महानगरपालिकेनेच आपल्या निधीतून महाराणा प्रतापसिंहाचा पुतळा बसविलेला आहे.त्याच प्रमाणे महात्मा बसवेश्वरांचा पुतळाही महानगरपालिकेच्या वतीने बसविण्या येईल. |
| **दिपकसिंह रावत** | महाराणा प्रतापसिंहाचा पुतळा बसविण्यासाठी आम्ही खुप अग्रेसिव्ह होतो.आम्ही वारंवार शासनाकडे पाठपुरावा करुन महाराणा प्रतापसिंहांचा पुतळा बसविण्यासाठी परवानगी आणलेली आहे. आमचे शिवसेना बीजेपीचे शासन आहे नियोजित महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविण्यासाठी शासनाकडून मान्यता आनू, प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. |
| **अ.सत्तार** | आजच्या विषय पत्रिकेवर पुतळयाचा विषय नाही त्यामूळे विषय पत्रिकेस सुरवात करण्यात यावी. |

(४)

| | |
|---|---|
| **विनय गुर्रम** | विरोधी पक्षाच्या नगरसेवकांना बोलण्याची परवानगी देण्यात येत नाही नियम सर्वाना सारखे ठेवावे आम्हालाही बोलू देण्यात यावे. श्री दिपकसिंह रावत हे बोलत असतांना इतर सदस्य का अडथळा आणीत आहेत. |
| **महापौर** | प्रथम महिला आधी बोलण्याची संधी देण्यात यावी असे ठरलेले आहे त्यामूळे प्रथम महिलांना बोलण्याची परवानगी देण्यात येते. |
| **दिपकसिंह रावत** | सं. सदस्यांना आचारसंहिता लागू केली होती त्याचे काय झालेले आहे. आचारसंहितेचा ठरावाची अमलबजावणी करण्यात येते किंवा नाही. तो ठराव विंखंडीत झालेला आहे काय याचा खुलासा नगरसचिवांनी करावा. |
| **विरेंद्रसिंघ गाडीवाले** | सभेचें कामकाज महापौरांच्या अध्यक्षतेखाली चालते महिलांना प्रथम संधी देण्याचे पिठासीन अधिका-यानी तथा महापौरांनी सांगितलेले आहे त्यामूळे प्रथम महिलानां बोलण्याची संधी देण्यात यावी. |
| **अंजली गायकवाड** | सभागृहात ५० टक्के महिला सदस्यां असुन पुरुषांना जेवढा बोलण्याचा अधिकार आहे तेवढाच अधिकार महिला सदस्याना सुध्दा आहे. महिला सदस्या बोलत असतील तर पुरुष सदस्यांनी बोलू नये, मागील सभेत दोन सदस्यामध्ये झटापट होवून त्यांनी आपआपल्या समोर असलेले माईक तोडून एकमेकाच्या अंगावर फेकुन मारले परंतु त्यांचा नेम चुकल्यामुळे तो माईक मला लागला असता परंतु माझ्या प्रसंगावधानामुळे मला इजा झाली नाही सभागृहात ५० टक्के महिला असून त्यांना संरक्षण देण्याच्या संदर्भात मी मा. जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, मा.महापौर मा. आयुक्त साहेबांना निवेदन दिलेले आहे.माझी महापौरांना विनंती आहे की, जर सभागृहात विकास कामावर चर्चा न करता पुरुष सदस्य आपसात एकमेकाशी भाडंत असतील महिला सदस्यांची वेगळी स्वतंत्र बैठक घेण्यात यावी. मी आयुक्त साहेबांना व मा. महापौरांना जे निवेदन दिले होते त्या अनुषंगाने त्यांनी काय कार्यवाही केली याचा खुलासा करण्यात यावा. मला आज शिवाजीनगर व वजिराबाद पोलिस स्टेशनमध्ये बयान देण्यासाठी बोलाविले होते, परंतु मी मुध्दामून गेले नाही आज सर्वसाधारण सभेत काय पकार घडतो होता हे पाहून मी पोलिस स्टेशनला जाणार आहे. |
| **आयुक्त** | सर्वसाधारण सभेचे कामकाज हे मा.महापौरांच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या नियंत्रणात चालते त्यामूळे सभागृहात ज्या काही बाबी घडतात त्यावर महापौरानी/ सभागृहाने निर्णय घ्यावयाचा असतो. आयुक्त त्यावर कोणतीही कार्यवाही करु शकत नाही. मी शासनाचा प्रतिनिधी या नात्याने मागील सभेत जो काही प्रकार धडला त्याचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनास सादर केलेला आहे. |
| **विरेद्रसिंघ गाडीवाले** | सौ.अंजलीताई गायकवाड मॅडमने चांगला प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यास आम्हीही सहमत आहोत. स.सदस्यांनी जे काही कृत्य केले ते जाणून बुजून केलेले नाही,आवेशात येवून हा प्रकार घडलेला आहे. सभागृहात ५० महिला सदस्या आहेत त्यांच्या समोर स.सदस्यांनी असासंदीय शब्द वापरु नये, त्यांचा अवमान होणार नाही असे शब्द वापरु नये. व भविष्यात असे प्रकार सभागृहात होवू नये म्हणून स. सदस्यांनी दक्षता घ्यावी. |
| **अंजली गायकवाड** | आपण आपल्या प्रभागातील समस्या सोडविण्याच्या दृष्टीकोतून सभागृहात येतो प्रत्येकांना आपल्या प्रभागातील समस्या मांडण्याचा अधिकार आहे त्यामूळे प्रत्यैंक महिला सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी. महिला सदस्या बोलत असतांना इतर सदस्यांनी आरडा ओरड करुन अडथळा आणू नये. विशेषः पहिल्या दोन लाइन मध्ये बसलेले सदस्य महिला सदस्यांना बोलूच देत नाही वारंवार मध्ये बोलून अडथळा आणतात, त्यानी महिला सदस्यांना समजून घ्यावे. |

**महापौर** मागील सभेत ज्या स.सदस्यांनी गैरवर्तन केले त्या दोन्ही सदस्यांना समज देण्यात आलेली आहे त्यामूळे मागील सभेप्रमाणे ते पुन्हा सभागृहात असे गैरवर्तन करणार नाही, मागील सभेत जो काही प्रकार घडला त्यामूळे महिला सदस्या खुपच व्यवस्थीत झाल्या होत्या यापुढे कोणताही नगरसेवक सभेत गैरवर्तन करणार नाही याची मला खात्री आहे.

**रामनारायणजी काबरा** मागील एका वर्षात झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कालच देण्यात आलेले आहे.मागील सभेत कोणकोणते ठराव पास करण्यात आले कोणते ठराव ना मंजुर करण्यात आले याची माहिती होण्यासाठी मागील सभेचे इतिवृत्त पुढील सभेत देणे आवश्यक आहे. परतू ते देण्यात येत नाही ही चुकीची पध्दत आहे. कायद्यात काय तरतूद आहे याबाबत नगरसचिवानी मार्गदर्शन करावे.

**उमेश चव्हाण** श्री रामनारायणजी काबरा यांनी जी सुचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे. कालच स.सदस्यांना इतिवृत्त मिळालेले आहे .नियमानुसार सदस्यांना इतिवृत्त किती दिवस अगोदर मिळावयास पाहिजे याचा खुलासा नगरसचिवांनी करावा.

**फारुख अली खॉं** एका वर्षात झालेल्या सभेचे इतिवृत्त एकदमच देण्यात येत आहे.मागील एका वर्षात कोणते ठराव पास करण्यात आले कोणते ठराव नापास करण्यात आले कोणत्या ठरावास कोणी विरोध केला हे आम्हाला कसे समजणार इतिवृत्त नियमित द्यावयास पाहिजे.

(५)

**नगरसचिव** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने जे सभेचे कामकाज नियम केलेले आहे त्यातील नियम क्र २ अ. कामकाज बाबीचा क्रम ज्या क्रमाने त्या आयुक्तांकडून पाठविण्यात आलेल्या असतील त्या क्रमाने नगरपालिका सचिवाकडून लावण्यात येईल आणि त्यांना अनुक्रमांक देण्यात येतील बाबीचा क्रम खाली नमूद केल्या प्रमाणे असेल

अ) प्रश्न

ब) मागील सर्व साधारण सभेचे किंवा सभांचे किंवा मागील सर्वसाधारण सभेनंतरच्या विशेष सभेचें किंवा सभाचे कार्यवृत अशी कामकाज नियमता तरतूद आहे.आजच्या पुरवणी विषय पत्रिकेवर विषय क्र.१ हा मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा प्रस्ताव आहे.यापुढे नियमित इतिवृत्त देण्याची दक्षता घेण्यात येइल.

**रामनारायणजी काबरा** मागील सभेत कोणकोणते ठराव पास करण्यात आले कोणते ना मंजुर करण्यात आले याची आठवण स.सदस्यांना राहत नाही नियमानुसार मागील सभेचे इतिवृत्त हे पुढील सभेत दिलेच पाहिजे परंतु ते देण्यात येत नाही ही चुकीची पध्दत आहे.माझे म्हणणे इतिवृत्तात नोंद करण्यात यावी.

**अंजली गायकवाड** सर्वोच्च महासभेसमोर आयुक्त साहेबांना व महापौरांना माझे निमंत्रण आहे त्यांनी माझ्या प्रभागात भेट द्यावी. प्रभागात मलनिस्सारण लाईन टाकण्यात आली परंतु क्रॉस कनेक्शन देण्यात आलेले नसल्यामूळे नागरीकांच्या शौचालय ओव्हरफलो होवून मलनिस्सारणाचे पाणी बाथरुम मध्ये घरात जात आहे,एकच रुम असल्यामूळे नागरीक त्याच ठिकाणी जेवण करतात दुर्गधीमूळे नागरीक आजारी पडत असून त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे.मलनिस्सारण लाइनला क्रॉस कनेक्शन का देण्यात येत नाही याचा जाब संबंधित अभियंत्यास विचारण्यात यावा.

**श्रध्दा चव्हाण** सभागृहात ५० टक्क्यापेक्षा अधिक महिला सदस्या असतांना व महापौरही महिला असतांना महिला सदस्यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी पंधरा मिनिटाचा अर्ध्या तासाचा वेळ देण्याची मागणी का करण्यात येत आहे, यापुढे पुरुष सदस्यांनी महिला सदस्यांना आम्हाला बोलण्याची संधी द्यावी अशी मागणी करण्यास आम्ही भाग पाडू. स.सदस्यांनी आम्हाला पुरवणी विषय पत्रिका, इतिवृत्त खुप उशिरा मिळाले आमचा अभ्यास झाला नाही म्हणून विषय स्थगित ठेवावा अशी मागणी करीत आहे मागील वर्षी महानगरपालिकेने आपणास लॅपटॉप उपलबध्द करुन दिले ते शोभेची वस्तु म्हणून दिलेला आहे काय या लॅपटॉपचा उपयोग आपण करावयास पाहिजे.राज्यातहील काही सिंधूदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयात पेपरलेस कामकाजाची पध्दत सुरु केलेली आहे.महानगरपालिकेने लॅपटॉप देवून आपणास खुप चांगल संधी उपलब्द करुन दिलेली आहे. स.सदस्यांनी आपले ई मेल आय डी नंबर दिला तर त्यावर आपणास विषय पत्रिका इतिवृत्त पुरवणी इतिवृत्त मिळू शकते यामूळे महानगरपालिकेचा कागदाचा व झेरॉक्स काढण्याचा खर्च वाचु शकतो सर्व सदस्यांना विनंती आहे की, आपणास देण्यात आलेल्या लॅपटॉपचा पुरेपूर उपयोग घ्यावा. आपला ई मेल आयडी नंबर नगरसचिव विभागास देण्यात यावा.

**महापौर** सर्व सदस्यांनी आपले ई मेल आयडी नंबर नगरसचिव विभागास द्यावा. ज्यानी ई मेल आयडी नंबर दिला त्यांना त्यावर सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका पुरवणी विषय पत्रिका इतिवृत्त पाठविण्यात येईल.

**आयुक्त** पेपरलेस करण्याच्या दृष्टीने सौ.श्रध्दा चव्हाण मॅडमनी जी सुचना केली आहे ती अत्यंत चांगली आहे.स.सदस्यांनी ई.मेल आयडी नंबर देवून त्याव्दारे विषय पत्रीका ,पुरवणी विषय पत्रिका ,इतिवृत्त व महानगरपालिकेचे पत्र देण्याची विनंती/संम्मती दिली तर त्यांना ईमेल व्दारे पाठविण्यात येईल.यामूळे महानगरपालिकेच्या खर्चात बचत होईल,

**प्रा.ललिता बोकारे (शिंदे)** शहरात काही ठिकाणी दोन दिवसाआड तर काही ठिकाणी तीन दिवसा आड पाणी पुरवठा होतो,काही भागात पाणी पुरवठयाची व्यवस्था नसल्यामूळे तेथे पाणी टंचाई जाणवते म्हणून आमची अशी मागणी आहे की प्रत्येक प्रभागात दोन दोन विंधन विहिरी घेवून त्या भागातील नागरीकांना पाण्याची सुविधा उपलब्ध्द करुन देण्यात यावी.ब-याचश्या प्रभागातील हातपंप ना दुरुस्त आहे तेही दुरुस्त करुन देण्यात यावे जेणे करुन नागरीकांना पाणी मिळू शकेल असे मला वाटते. सदस्यांना त्यांच्या स्वेच्छा निधीतून विंधन विहिरी घेण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**आयुक्त** जलाशयातील पाण्याचा साठा विचारात घेवून जास्त जास्त दिवस पाणी मिळावे म्हणून महापौर व स.सदस्यांशी चर्चा करुनच तिन दिवसा आड पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.तांत्रिक कारणामूळे किंवा चुकीने एकादे वेळेस दुस-या दिवशी पाणी पुरवठा झाला असेल, सध्या विष्णुपुरी जलाशयात १५ टक्के पाणी शिल्लक असून उपलब्ध्द असलेल्या पाण्याच्या साठयातून काटकसरीने पाणी घेत आहोत.उन्हाळयात पाणी टंचाई निर्माण होवू नये म्हणून

शहरातील पाणी असलेल्या सर्व हात पंपाची व पावर पंपाची नियमित दुरुस्ती करण्यासाठी झोन निहाय एजन्सी नेमलेली असून त्याचे मार्फत हातपंपाची व पावर पंपाची दुरुस्ती करण्यात येत आहे. आपण



मागील वर्षापासून महागरपालिका निधीतून नविन विंधन विहीरी घेण्याचे बंद केलेले आहे. आमदार व खासदारानी काही प्रभागात विंधन विहिरीसाठी निधी दिलेला आहे त्या निधीतून विंधन विहिरी घेण्यात आलेल्या आहेत.सतत ४ वर्षापासून पाऊन न पडल्यामूळे पाण्याची पातळी खाली गेलेली आहे. ज्या ठिकाणी नविन विधंन विहिरी घ्यावयाची त्यासाठी जीएसडीएची परवानगी लागते. व ते २०० फुटापर्यंत विधन विहिर घेण्यास मान्यता देते त्यामूळे विंधन विहीवर खर्च करु नये अशी आमची धारणा आहे. उदभवलेल्या परिस्थितीत पाण्याचे नियोजन करुन नागरीकांना पाणी पुरवठा करण्याचे आपण प्रयत्न करीत आहोत.

**फारुख अली खॉ** मागील ४ वर्षपासून पावूस न पडल्यामूळे राज्यातील सर्वच शहरामध्ये पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे परंतू नांदेड शहरात अद्यप पाणी टंचाई निर्माण झालेली नाही याचे सर्व श्रेय आयुक्त अभियंत्यांना आहे त्यांनी रात्रदिवस मेहनत करुन योग्य प्रकारे पाण्याचे नियोजन केल्यामूळेच नागरीकांना पाणी मिळत आहे त्याबध्दल मी आयुक्त साहेबांचे व पाणी पुरवठा विभागातील अभियंत्याचे अभिनंदन करतो.माजी मुख्यमंत्री आदरणीय कै.शंकरराव चव्हाण साहेबांनी ५० वर्षापुर्वी दुरदृष्टी ठेवून भविष्यात नांदेड शहराला पाण्याची टंचाई निर्माण होवू नये म्हणून गोदावरी नदीवर धरण बांधले आणि त्यातूनच आज नांदेड शहराला पाणी पुरवठा होत आहे. आयुक्त साहेबांनी सांगवी पर्यायी पाणी पुरवठा योजना कमी कालावधीत पुर्ण केली. विष्णुपुरी धरणातील सांगवी बंधा-यातील गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढविली, यामूळे बराचसा पाण्याचा प्रश्न सोडविलेला आहे. मागील ४ वर्षापासुन पाऊस न पडल्यामूळे ५००-६०० फुट विंधन विहिरी घेवूनही पाणी लागत नाही ही वस्तुस्थीती आहे. आयुक्त साहेबांना विंनती आहे की. शहरातील ज्या विंधन विहिरीला मुबलक प्रमाणात पाणी आहे त्या विधन विहिरीवर विद्युत पंप बसवून त्याव्दारे त्या त्या भागातील नागरीकांना पाणी पुरठा करण्यात यावा.

**सोनाबाई मोकले** माझ्या प्रभागात काही भागात अजिबात पाणी पुरवठा होत नाही. बोअर कोरडे पडलेले काही हातपंप नादुरुस्त आहेत.आयुक्त साहेबाना विनंती आहे की ज्या भागात पाणी पुरवठा होत नाही तेथे पाणी पुरवठा होण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्याकरीता सबंधित अभियंत्याना आदेशित करावे.हातपंप दुरुस्त करण्यात यावे.

**रजिया बेगम** मोकळे मावशीने जो मुध्दा उपस्थित केलेला आहे तो बरोबर आहे काही भागात अजिबात पाणी पुरवठा होत नाही त्यामूळे संबंधित अभियत्यांना ज्या भागात पाणी पुरवठा होत नाही तेथे पाईप लाईनवर व्हाल्व्ह बसविण्यासाठी पर्यायी पाईप लाईन टाकण्यासाठी आदेशित करावे. ड्रेनेजचा प्रश्न आहे दररोज ड्रेनेज लाईन चोकअप होत आहे किंती दिवस ड्रेनेज चोकअप काढणार जी पाईप लाइन वारंवार चोकअप होत असेल अशा पाईप लाईन बदलण्यासाठी संबंधित अभियंत्यांना आदेशित करावे अशी आयुक्त साहेबांना विनंती

**डॉ.करुणा जमदाडे** भविष्यात शहरात पाणी टंचाई निर्माण होवू नये म्हणून आयुक्त साहेबांनी खरोखर विविध उपाय योजना करुन पाण्याचे चांगल्या प्रकारचे नियोजन केले व पाण्याचा प्रश्न सोडविलेला आहे त्याबध्दल मी सभागृहाचे वतीने आयुक्त साहेबाचे अभिनंदन करते. परंतु माझ्या प्रभागातील दलित वस्तीत जसे राहूलनगर शाहूनगर भागात पाण्याची मोठी समस्या आहे. त्या भागातील नागरीकाना दुरवरुन पाणी आणावे लागत आहे. पाईप लाईन टाकण्यासाठी वारंवार संबंधित विभागाकडे पाठपुरावा करीत आहे परंतु संबंधित विभागाकडून पाईप उपलब्ध्द नाही असे उत्तर देण्यात येते ,आयुक्त साहेबांना विनंती आहें की ज्या ज्या भागात पाईप नसल्यामूळे पाण्याची समस्या आहेत अशा भागात पाईप लाईन टाकून पाण्याची सुविधा देण्यात यावी.

**मोहिनी कनकदंडे** माझाही पाण्याचाच प्रश्न पाणी पुरवठा लाईनला गळत्याचे प्रमाणे जास्त असल्यामूळे पाणी मोठया प्रमाणात वाया जात आहे. काही भागात कमी इंचीची पाईप लाईन टाकल्यामूळे सुरवातीच्या भागात जास्त वेळ पाणी पुरवठा होतो शेवटच्या भागास पाणी पुरवठा होत नाही. आयुक्त साहेबाना विंनती आहे की जून्या झालेल्या पाईप लाईन बदलून नविन जास्त इंचीच्या पाईप लाईन टाकण्यात याव्यात.

**श्रध्दा चव्हाण** माझ्या प्रभागातील काही भागात पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली नाही कृपया याकडे लक्ष देवून पाईप लाईन टाकून पाणी पुरवठा करावा अशी विनंती आहे.

**दिपकसिंह रावत** सर्वच प्रभागात पाण्याची समस्या आहे. परभणी महानगरपालिकेने ज्या नागरीकांनी आपल्या नळास तोटया लावलेल्या नाहीत त्यांना दंड आकारुन वसुल करणे व तोटया लावण्यासाठी भाग पाडण्याकरीता एक स्वतत्र पथक स्थापन केलेले आहे. तश्याच प्रकारचे पथक स्थापन करण्यात यावे. सतत ४ वर्षापासून पावसाचे प्रमाण कमी झाल्यामूळे जमिनीतील पाण्याची पातळी कमी झालेली आहे.लातूर महानगरपालिकेने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ज्या विंधन विहिरीला पाणी आहे अशा विंधन विहिरीतील आयर्न पाईपला पिव्हिसी पाईप जोडून लांबी वाढविलेली आहे,त्यामूळे नागरीकांना पाणी मिळत आहे. तश्याच प्रकारची कार्यवाही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने करावी ,महानगरपालिका हध्दीत जीएसडिए च्या मान्यतेने २०० फुटाचे बोअर घेण्यात आलेले आहे परंतु १२० फुटापर्यत पाईप टाकण्यात आलेले आहे. जर आयर्न



पाईपला जोडून खाली आणखी ५०-६० फुटाचे पिव्हीसी पाईप टाकले तर हात पंप चालू शकतो व नागरीकांचा पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. शहरातील हात पंप दुरुस्ती करण्याकरीता एजन्सीची नियुक्ती करण्यात आलेली आहे परतु त्याचंकडे हात पंप दुरुस्तीकरीता लागणारे मजुराची संख्या कमी असल्यामूळे हात पंप दुरुस्ती करण्याकरीता वेळ लागत आहे तसेच त्यांचे पेमेंट लवकर मिळत नाही ते काम करीत नाही , पाणी पुरवठा विभागात जे मजुर आहेत त्यांनाही ना दुरुस्त हातपंप दुरुस्ती करण्याकरीता आदेश देण्यात यावे.

**आयुक्त** श्री दिपकसिंह रावत यांनी जी सुचना केली आहे ती स्वागतार्ह आहे. नियमाप्रमाणे जीएसडीए च्या मान्यतेने २०० फुटाचे विंधन विहीरी घेतलेल्या असून ११० ते १२० फुटापर्यत लोंखडी पाईप टाकलेले आहेत, लातूर महानगरपालिकेने १२० फुटानंतर पिव्हिसी पाईप टाकणेसाठी जीएसडिएची परवानगी घेतली आहे

किंवा कसे याबाबतची सविस्तर माहिती लातूर महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आपणास नागरीकांना ४ महिणे रिलीफ द्यावयाचा आहे. श्री दिपकसिंह रावत यांनी जी सुचना केलेली आहे ती अतिषय चागली सुचना आहे.विंधन विहिरीत जास्तीचे ५०-६० फुट पिव्हीसी पाईप टाकून पाईप ची लांबी वाढविण्यात यावी. संपूर्ण शहरात हा पॅटर्न लागू करण्यात यावा.

**आयुक्त** परभणी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने शहरातील जे नागरीक पाण्याची चोरी करतात किंवा नळास तोटया न लावता पाणी वाया घालवतात अशांना दंड आकारण्याचा ठराव पारीत केलेला आहे तशाच प्रकारचा ठराव महासभेने घ्यावा,जेणे करुन पाण्याची चोरी होणार नाही किंवा पाणी वाया जाणार नाही. पाणी वाया घालणा-या नागरीकाविरुध्द कार्यवाही करण्यासाठी पंचनामा करतांना त्या त्या प्रभागातील नगरसेवक तेथे उपस्थित असावा.

**स.शेर अली** जे नागरीक नळाला तोटया लावीत नाहीत व पाणी वाया घालवितात त्यांना दंड आकारण्याचा प्रस्ताव चांगला आहे परंतु यामध्ये नगरसेवक हस्तक्षेप करु शकत नाही ही प्रशासकीय बाब आहे प्रशासनाने आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

**डॉ.करुणा जमदाडे** नळाला तोटया बसविण्याची जी मागणी केली आहे ती अत्यंत चांगली आहे. प्रत्येक नळ कनेक्शनला तोटया लावण्यात याव्यात जेणे करुन पाण्याची बचत होवून पाणी वाया जाणार नाही.

**आयुक्त** महानगरपालिकेच्या पाईप लाईनवरुन पाण्याचे कनेक्शन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे परंतु नागरीकांनी घेतलेल्या नळ कनेक्शनला तोटी लावण्याची जबाबदारी ही संबंधित नागरीकांची आहे. आर्थिक दृष्टया व प्रशासनाच्या दृष्टीने हा प्रस्ताव योग्य नाही.

**उमेशसिंह चव्हाण** ३० ते ४० रुपयाला तोटी मिळते हा खर्च नागरीकांकडून वसुल करण्यात यावा.

**अशोक उमरेकर** महागनरपालिकेने तोटया खरेदी करुन त्या बसविण्यात याव्यात व त्याचा खर्च पाणी पटटी बरोबर वसुल करण्यात यावा.

**आयुक्त** वारंवार जाहिर आवाहन करुनही नागरीक मालमत्ता कराचे पाणी पटटीचे देयके भरीत नाही. महानगरपालिकेने नागरीकांच्या खाजगी नळांना तोटया लावाव्यात अशी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात तरतूद नाही.नागरीकांना आपण पाणी देत आहोत पाणी वाचविणे हे त्यांची जबाबदारी आहे.

**शेख बावजीर** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कलम २१(२) नुसार दर चार वर्षातून एकदा नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले पाहिजे अशी तरतूद आहे.यापुर्वी नविन कर आकारणी पुस्तक कैंव्हा करण्यात आले होते याची माहिती देण्यात यावी.

**आयुक्त** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेत समावेश होतांना महाननगरपालिकेत वेगवेगळया सुधारणा करण्याचा (रिफॉर्म) करार करण्यात आला होता त्या अंतर्गत सन २०१३ ला मुल्याधारीत पध्दतीत लागू होणारे मालमत्ता कराचे दर निश्चित करुन मालमत्त कराची पुनर कर आकारणी करण्यात आलेली आहे.

**रामनारायणजी काबरा** प्रजावाणीत शहरातील नागरीकाकरीता आसना बंधा-यातून पाणी घेण्यात येत असल्याची बातमी प्रसिध्द झाल्यांनतर आम्हाला समजले आहे हे खरे आहे काय.

**आयुक्त** आसना बंधा-यातून पाणी घेण्याची पर्यायी योजना पुर्ण झालेली असून महानगरपालिकेने ५ डिसेंबर ते २१ डिसेंबर या दरम्यान आसना नदीतून पाणी घेतलेले आहे.

**अशोक उमरेकर** महानगरपालिकेचा मालमत्ता कर व पाणी पटटी भरल्याशिवाय नागरीकांना जन्म व मृत्यू प्रमाण देण्यात येत नाही जे गोरगरीब भाडेकरु आहेत त्यांचे घरमालक मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामूळे भाडेकरुची खुपच गैरसोय होत आहे म्हणून नागरीकांना जन्म मृत्यूचे प्रमाणे विना अट देण्यात यावे अशी विनंती आहे.

**स्नेहा पांढरे** नळ कनेक्शनला वॉटर मिटर लावण्याचा प्रस्ताव होता त्याचे काय झाले.काही भागात दोन दोन दिवस पाणी पुरवठा होतो त्यामूळे पाणी मोठया प्रमाणात वाया जात आहे.



**आयुक्त** काही शासकीय कार्यालय, संस्था, कमर्शीयलला मिटरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो. ३५०० नळ कनेक्शनला वॉटर मिटर लावण्याचा प्रस्ताव होता परंतु शहरात जवळपास ५० ते ५२ हजार नळ कनेक्शन असून त्यापैकी फक्त ३५०० नागरीकांना वॉटर मिटरव्दारे पाणी पुरवठा करणे क्रिटीकल होईल व मिटरव्दारे पाणी घेण्या-यावर अन्याय होईल.शहरात सन १९४०-१९५० ला पाणी पुरवठा लाईन टाकलेली असून त्यानंतर जेएनएनयुआरएम अंतर्गत नविन पाइप लाईन टाकण्यात आलेली आहे जून्या व नविन पाईपलाईनचे एकच व्हाल्व्ह असल्यामूळे नविन व जून्या पाईप लाईन व्दारे पाणी पुरवठा होवून पाणी वाया जात असल्याचे निदर्शनास आल्यामूळे अशा जून्या पाईप लाईनचे कनेक्शन त्वरीत कट करण्यासाठी अभियंत्यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

**विषय क्र.१**

दि.२४.३.२०१५, दि.२०.५.२०१५, दि.५.८.२०१५, दि.३०.१०.२०५ रोजी झालेल्या झालेल्या पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ,महिला व बाल कल्याण समितीच्या सभेच्या इतिवृत्ताची नोंद घेणे बाबत.

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. १३०** **ठराव**

दि.२४.३.२०१५, दि.२०.५.२०१५, दि.५.८.२०१५, दि.३०.१०.२०५ रोजी झालेल्या झालेल्या पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ,महिला व बाल कल्याण समितीच्या सभेच्या इतिवृत्ताची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |
| ११ | नोंव्हेबर | १४७४ | १२७२ | २७४६ | ८६२.९५ |
| १२ | डिसेंबर | १५८० | १४६२ | ३०४२ | ९२५.३१ |
| | एकूण | १५६३२ | १४२४४ | २९८७६ | ९११.२० |

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. १३१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील खालील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वावानूमते घेते.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |
| ११ | नोंव्हेबर | १४७४ | १२७२ | २७४६ | ८६२.९५ |
| १२ | डिसेंबर | १५८० | १४६२ | ३०४२ | ९२५.३१ |
| | एकूण | १५६३२ | १४२४४ | २९८७६ | ९११.२० |



**विषय क्र.३**

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा आज पर्यत झालेली कार्यवाही**

एकूण वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी प्राप्त अर्ज - ५०७३
वैयक्तीक शौचालय बांधकामाचे तपासणी व मान्यता (अभियंत्याव्दारे) - २५८४
नाकारलेल्या अर्जाची संख्या - २४८९
एकूण कार्यारंभ आदेश दिलेल्याची संख्या - ५४६
केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या फार्मची संख्या - ३५७०
वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम प्रगतीपथावर - ४६५
एकूण प्राप्त अनुदान - २.०९ (कोटी)
वैयक्तीक शौचालयासचे बांधकामावर झालेला एकूण खर्च (कंत्राटदारामार्फत) - १७.२८ (रुपये लक्ष)
वैयक्तीक शौचालयासचे बांधकामाचे ९० टक्के झालेल्याची संख्या - २७०

वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया चालू असून ज्या प्रमाणे कामे होतील त्याप्रमाणे कंत्राटदारांना देयक अदाई करण्यात येत आहे.मार्च २०१६ अखेर २५०० वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम करण्याचे उदिष्ट ठरविलेले आहे.

**महापौर** आयुक्तांनी सादर केलेला स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावाची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. १३२** **ठराव**

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत खालील प्रमाणे केलेल्या अंमलबजावणीची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**आज पर्यत झालेली कार्यवाही**

एकूण वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी प्राप्त अर्ज - ५०७३
वैयक्तीक शौचालय बांधकामाचे तपासणी व मान्यता (अभियंत्याव्दारे) - २५८४
नाकारलेल्या अर्जाची संख्या - २४८९

| | | |
|---|---|---|
| एकूण कार्यारंभ आदेश दिलेल्याची संख्या | - | ५४६ |
| केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या फार्मची संख्या | - | ३५७० |
| वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम प्रगतीपथावर | - | ४६५ |
| एकूण प्राप्त अनुदान | - | २.०९ (कोटी) |
| वैयक्तीक शौचालयासचे बांधकामावर झालेला एकूण खर्च (कंत्राटदारामार्फत) | - | १७.२८ (रुपये लक्ष) |
| वैयक्तीक शौचालयासचे बांधकामाचे ९० टक्के झालेल्याची संख्या | - | २७० |

वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया चालू असून ज्या प्रमाणे कामे होतील त्याप्रमाणे कंत्राटदारांना देयक अदाई करण्यात येत आहे.मार्च २०१६ अखेर २५०० वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम करण्याचे उदिष्ट ठरविलेले आहे.

**विषय क्र.४**

शासन निर्णय क्र. मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.१५ जानेवारी २०१६ नुसार नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ जानेवारी२०१५ ते सप्टेंबर२०१५ या कालावधीतील महागाई भत्याची थकबाकीची रक्कम महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनूसार अदाई करण्यासाठी नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/१३७१५/२०१६ दि.२० जानेवारी २०१६ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते

(१०)

**ठराव क्र.१३३** **ठराव**

शासन निर्णय क्र. मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.१५ जानेवारी २०१६ नुसार नांवामनपाकेतील पात्र कर्मचा-यांना दि.१ जानेवारी२०१५ ते सप्टेंबर२०१५ या कालावधीतील महागाई भत्याची थकबाकीची रक्कम महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनूसार अदाई करण्यासाठी नांवामनपा आदेश प.क्र.नांवाशमनपा/लेवि/१३७१५/२०१६ दि.२० जानेवारी २०१६ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामना सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.५**

नांदेड शहराची सूधारीत विकास योजना शासनाने टिपीएस-३२०६/४८८/प्र.क्र.१०४/नवि-३० दि.३ ऑगस्ट २००६ नूसार मंजुर केली आहे.सदर सुधारीत विकास योजनेमधील मौ नांदेड मधील सेक्टर डी मधील सर्व्हे नंबर ११९ मध्ये ईपी -११ (६) नूसार मध्यवर्ती इमारत (महसूल) सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविलेले आहेत.त्यापैकी १.६ हेक्टर जागा नकाशात दर्शवील्यानूसार मूस्लीम कब्रस्थानसाठी आरक्षित करण्याबाबत मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं ५५ दि ३०.०४.१०१३ असा प्रथम ठराव पारीत झाला आहे.व ठराव क्रं ४७ दि.१९.०७.२०१४ असा अंतिम ठराव दि.१९/०७/२०१४ असा अंतीम ठराव पारीत करून महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ ची वैधानिक कार्यवाही करुन शासनास पत्र क्र.१५९९ दि.३.८.२०१५ अन्वये विहीत मार्गाने सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे सुधारणा मध्ये कलम ३७ च्या अनुषंगाने शासन राजपत्रात नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून एक वर्षाच्या आंत शासनास सादर होणे आवश्यक असल्याने प्रस्तूत प्रकरण नव्याने मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

तरी उक्त जागेत मुस्लीम कब्रस्थानसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे सुधारणा मध्ये कलम ३७ अन्वये आरक्षण प्रसतावित करण्याबाबतचा किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करणेचा प्रस्ताव सादर.

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१३४** **ठराव**

नांदेड शहराची सूधारीत विकास योजना शासनाने टिपीएस-३२०६/४८८/प्र.क्र.१०४/नवि-३० दि.३ ऑगस्ट २००६ नूसार मंजुर केली आहे.सदर सुधारीत विकास योजनेमधील मौ नांदेड मधील सेक्टर डी मधील सर्व्हे नंबर ११९ मध्ये ईपी -११ (६) नूसार मध्यवर्ती इमारत (महसूल) सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविलेले आहेत.त्यापैकी १.६ हेक्टर जागा नकाशात दर्शवील्यानूसार मूस्लीम कब्रस्थानसाठी आरक्षित करण्याबाबत मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं ५५ दि ३०.०४.१०१३ असा प्रथम ठराव पारीत झाला आहे.व ठराव क्रं ४७ दि.१९.०७.२०१४ असा अंतिम ठराव दि.१९/०७/२०१४ असा अंतीम ठराव पारीत करून महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ ची वैधानिक कार्यवाही करुन शासनास पत्र क्र.१५९९ दि.३.८.२०१५ अन्वये विहीत मार्गाने सादर करण्यात आला असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे सुधारणा मध्ये कलम ३७ च्या अनुषंगाने शासन राजपत्रात नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून एक वर्षाच्या आंत शासनास सादर होणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे सुधारणा मध्ये कलम ३७ अन्वये उक्त जागेत मुस्लीम कब्रस्थानसाठी आरक्षण प्रस्तावित करण्या बाबतचा किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्याची मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६**

नांवामनपाकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेसाठी कंत्राटी शिक्षक म्हणून मे २०११ पासून ५ प्राथमिक व ८ माध्यमिक असे एकूण १३ कंत्राटी सह शिक्षक कार्यरत आहेत व प्राथमिक कंत्राटी शिक्षकांना रु. ६०००/- व माध्यमिक शिक्षकांना रु. ८०००/- एवढे प्रमिमहा एकत्रित वेतन देण्यात येत असून संबंधितांनी दि. २२.१२.२०१५ रोजी सामूहिक अर्ज करुन वाढती महागाई विचारात घेता एकत्रित वेतनात रु. ३००००/- याप्रमाणे वाढ करण्याची विनंती केली आहे.

करीता संबंधितांच्या विनंती अर्जावर विचार करता सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी तत्वावरील प्राथमिक कंत्राटी शिक्षकांना प्रतिमहा एकत्रित वेतन रु. ६०००/-ऐवजी रु. १२०००/- व माध्यमिक कंत्राटी शिक्षकांना रु. ८०००/- ऐवजी प्रतिमहा रु. १५०००/-याप्रमाणे प्रमिमहा एकत्रित वेतन देण्यास मान्यता देवून मनपा निधीतून खर्च करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**महापौर** आयुक्ताचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १३५** **ठराव**

नांवामनपाकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेसाठी कंत्राटी शिक्षक म्हणून मे २०११ पासून ५ प्राथमिक व ८ माध्यमिक असे एकूण १३ कंत्राटी सह शिक्षक कार्यरत आहेत व प्राथमिक कंत्राटी शिक्षकांना रु. ६०००/- व माध्यमिक शिक्षकांना रु. ८०००/- एवढे प्रमिमहा एकत्रित वेतन देण्यात येत असून संबंधितांनी दि.२२.१२.२०१५ रोजी सामूहिक अर्ज करुन वाढती महागाई विचारात घेता एकत्रित वेतनात रु. ३००००/-याप्रमाणे वाढ करण्याची विनंती केली आहे.

करीता संबंधितांच्या विनंती अर्जावर विचार करता सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी तत्वावरील प्राथमिक कंत्राटी शिक्षकांना प्रतिमहा एकत्रित वेतन रु. ६०००/-ऐवजी रु. १२०००/- व माध्यमिक कंत्राटी शिक्षकांना रु. ८०००/- ऐवजी प्रतिमहा रु. १५०००/-याप्रमाणे

प्रमिमहा एकत्रित वेतन देण्यास व हा खर्च मनपा निधीतून खर्च करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७**

**विषय** :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांच्या अंमलबजावणी बाबत.

**संदर्भ** :- नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे शासन निणर्य



क्रं.अमृत-2015/प्र.क्र-197/नवी-33 दि.13.10.2015

नगर विकास विभागाच्या संदर्भीय शासन निणर्य अन्वये अमृत योजनेच्या अंमलबजाणी करीता मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेले आहे. या शासन निर्णयानुसार अमृत योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने प्रस्तावित केलेली पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग नांदेड मार्फत प्रकल्पाचे नियोजन, कार्यान्वयन, प्रर्यवेक्षण व अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्यात आले आहे. त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केलेले आहे.

अ) पाणी पुरवठा प्रस्ताव

| S.No. | Project Name | Priority number | Year in which to be implemented | Year in which to be completed | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Additional Distribution Network for Nanded Water Supply Scheme for Universal coverage. | I | 2015-2016 | 2017-2018 | 17.60 Cr. |
| 2 | Consumer Metering, Rehabilitation H.S.C. and formation D.M.A.s for Nanded Water Supply Scheme | II | 2017-2018 | 2019-2020 | 73.00 Cr. |
| 3 | Development of New Source on Upper Penganga Project and lifting Raw Water for Nanded Water Supply Scheme | II | 2017-2018 | 2020-2021 | 260.00 Cr. |
| 4 | Augmentation of Distribution Network for Nanded Water Supply Scheme | III | 2017-2018 | 2019-2020 | 13.00 Cr. |
| 5 | Rehabilitation of Pumping Station and WTP for Nanded Water Supply Scheme | IV | 2018-2019 | 2020-2021 | 8.50 Cr. |
| | | | | **Total** | **372.1** |

ब) मलनिस्सारण प्रस्ताव

| S.No. | Project Name | Priority number | Year in which to be implemented | Year in which to be completed | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Laying Sewerage Collection System with Pumping Station for universal Coverage of Nanded Sewerage SchemeA | I | 2016-17 | 2018-19 | 21.0 |
| 2 | Rehabilitation of SPS and collecting duct in Godavari River to stop Pollution into River under Nanded Sewerage Scheme | I | 2016-17 | 2017-18 | 5.0 |
| 3 | Rehabilitation of House Service Connections, Connecting Septic Tanks to Collection Sewerage Scheme | II | 2017-18 | 2018-19 | 15.00 |
| | | | | **Total** | **41.00** |

एकूण (अ+ब): 413.10

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने पाणी पुरवठा व मलनिस्सारण अंर्तगत शहराच्या वितरण व्यवस्थे मधील जो गॅप शिल्लक आहेत. याचा समावेश करुन प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्ताव दि. 14.09.2015 रोजी अधिक्षक अभियंता म.जी.प्रा. औरंगाबाद यांच्या शिफारशीसह मुख्य अभियंता म.जी.प्रा. प्रादेशिक कार्यालय ठाणे (C.P.D.M.) येथे सादर करण्यात आला. ठाणे मुख्य अभियंता यांच्या तांत्रीक मान्यते नंतर दि. 16.09.2015 रोजी, स्थानिक स्वराज्य नागरी संस्था अंधेरी, मुंबई येथे केंद्र शासनाचे सचिव, महाराष्ट्र शासनाचे सचिव, मुख्य अभियंता म.जी.प्रा. या समिती समोर मा.आयुक्त यांनी प्रस्तावाची सविस्तर माहिती सादर केली. व सदर प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेने दि. 18.09.2015 रोजी केंद्र शासनास सादर करण्यात आला. केंद्र शासनाच्या मान्यते नंतर राज्य शासना कडून अंमलबजावणी करिता शासन निर्णय निर्गमीत झाले आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकडे पा.पू.व जनि विभागा अंतर्गत योजना राबविण्याच्या दृष्टीने अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंते, कनिष्ट अभियंते इ. सक्षम कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे. या अधिकारा-या मार्फत केंद्र शासनाच्या मंजूर JNNURM, BSUP, योजनेची कामे मनपा मार्फत करण्यात आली आहेत. ही कामे विहीत कालावधीत करण्यात येवून शहरातील नागरीकांना योजनेचा



लाभ मिळाला आहे. पा.पू.व जनि कामा अंतर्गत JNNURM, BSUP, योजनेतून 2WTP, 18 जलकुंभ, व 300 कि.मी. वितरण व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मलनिस्सारण योजनेत 2 STP, 4 SPS व 430 कि.मी. मलवाहिनीची कामे पूर्ण केलेली आहेत. या संपूर्ण कामामूळे नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा होत असून मलनिस्सारण सुरळीतपणे कार्यन्वीत आहेत.

शासन निर्णयात नमूद केल्यानुसार सदर योजनेच्या अंमलबजावणी करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास नागरी स्वराज्य संस्थेने 3 टक्के इतके प्रकल्प व्यवस्थापन शुल्क देणे आहे.

तरी सदर अमृत योजनेतील प्रस्ताव अंमलबजावणी साठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास देण्याच्या संमतीसाठी प्रस्ताव सर्व साधारण सभे समोर मान्यते साठी सादर आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** पाणी पुरवठा व मलनिस्सारणाची रु. ४१३.१० कोटीची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला त्याबध्दल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. यापुर्वी महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत रस्त्याची, पाणी पुरवठा व मलनिस्सारणाची,बिएसयुपीची कामे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने केलेली असल्यामूळे अटल मिशन अमृत योजनेतील सर्व कामे ही नांदेड वाघाळा शहर महागनरपालिकेमार्फत करण्यात यावी अशा प्रकारचा ठराव महानगरपालिकेने संमत केलेला असून तो शासनास सादर करण्यात आलेला आहे त्यामूळे प्रस्तावित ४१३.१० कोटीची कामे ही एमजीपी मार्फत न करता नांवामनपाकेनेच करावी,

**आयुक्त** केंद्र शासनाने २५ जून २०१५ ला स्मार्टसिटी, अटल मिशन अमृत योजना,सर्वासाठी घरे या तीन योजना घोषित केल्या होत्या त्यानुसार केंद्र शासनाचे डायरेक्टर ऑफ मिशन व महाराष्ट्र राज्याचे डायरेक्टर ऑफ मिशन यांनी महानगरपालिकेचे अटल मिशन अमृत योजने सर्व कच्चे प्रस्ताव हे व्हाया महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमार्फत शासनास सादर करण्याच्या सुचना प्रधान सचिव-२ नगरविकास विभाग यांना केल्या त्याप्रमाणे त्यांनी आपणास कळविले त्यानुसार हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आलेला आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** या योजनेची अमलबजावणी कोण करणार प्रस्तावात अमलबजावणी एमजीपी मार्फत करण्याचा उल्लेख आहे.

**आयुक्त** अटल मिशन अमृत योजनेच्या संदर्भात शासनाने जे जी.आर. काढलेले आहे त्यानुसार आपणास कार्यवाही करावी लागेल. महाराष्ट्र शासनाने अटल मिशन अमृत योजनेतील पाणी पुरवठा व मलनिस्सारण कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकरणाकडून करण्याचा निर्णय घेतलेला असून याकामास इन प्रिन्सीपल ॲप्रूव्हल एमजीपीच देणार आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** महानगरपालिकेने अटल मिशन अमृत योजनेतील सर्व प्रकल्पाची कामे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत व्हावी अशी मागणी शासनास केलेली आहे. त्यामूळे प्रस्तावातील कामाची अमलबजावणी ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत करण्यासाठी शासनास शिफारस करण्यात यावी या अटीवर या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**शेर अली** या प्रस्तावात किती नविन जलकुंभ बांधण्याचा प्रस्ताव आहे.

**आयुक्त** प्रस्तावात नविन तीन जलकुंभ बांधण्याचा प्रस्ताव आहे.

**संजय मोरे** आयुक्त साहेबांनी अटल मिशन अमृत योजनेतील पाणी पुरवठा व मलनिस्सारणाचया कामाचा कच्चा प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे सांगितलेले आहे सन २००७ मध्ये जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत वसरणी सिडको हडको कौठा या भागाकरीता नविन पाणी पुरवठा योजना करण्यात आली त्यामध्ये माझ्या प्रभागातील बराचसा भाग सोडण्यात आलेला आहे. जी काही पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्यात आली त्यास कनेक्शन देण्यास कोणीही तयार नाही. याप्रस्तावात न्यायनगर,रहिमपुरनगर, शक्तीनगर, यशोदानगर हा भाग घेण्यात आलेला नाही.या प्रस्तावात माझ्या प्रभागातील सर्व भागाचा समावेश झाल्याशिवाय या प्रस्तावास मान्यता देण्यात येवू नये.

**फारुख अली खा** श्री संजय मोरे यांनी जे सांगितलेले आहे ते एकदम बरोबर आहे. जेएनएनयूआरएम व बिएसयुपी योजनेचे प्रकल्प अहवाल तयार करतांना या प्रकल्पाल शहरातील बराचसा भाग सोडण्यात आला होता आता पुन्हा अशी चुक होवू नये म्हणून अभियंत्यांनी संबंधित नगरसेवकासह त्यांचे प्रभागाचा सर्व्हे करुन प्रभागातील जो भाग या प्रस्तावात समावेश करण्याचा राहिलेला आहे त्या भागाचाही प्रस्तावात समावेश करुनच प्रस्ताव जीबी पुढे ठेवावा. अशी आमची मागणी आहे.

**दिपकसिंह रावत** श्री फारुख अली खॉं यांनी जी सुचना केली त्यास माझे अनुमोदन आहे.सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून अभियंत्यांनी सर्व नगरसेवकाशी चर्चा करुन त्यांच्या सुचने प्रमाणे त्यांच्या प्रभागातील कामांचा प्रस्तावात समावेश करण्यात यावा त्यानंतर हा प्रस्ताव जीबी पुढे ठेवावा.

**नवलकुमार पोकर्णा** प्रत्येक नगरसेवकांशी चर्चा करुन त्यांच्या प्रभागातील भाग सुटलेला असेल तर त्या भागाचा समावेश प्रस्तावात करण्यात यावा.



**सरजितसिंघ गिल** केंद्र शासनाने अटज मिशन अमृत योजनेत नांदेड शहराचा समावेश केला त्याबध्दल मी केद्र शासनाचे स्वागत करतो.गुरु ता गददी च्या वेळेस अबचलनगर भागात मलनिस्सारण लाईन टाकण्याचा प्रस्ताव होता परंतु ते काम त्यावेळी झालेली नाही म्हणून श्री अ.सत्तार हे महापौर असतांना सर्वसाधारण सभेने १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून अबचलनगर भागातील मलनिस्सारण चिनी मातीची पाईप लाईन बदलून नविन पाईप लाईन टाकण्यासाठी रु. १.५० कोटीस मान्यता दिलेली आहे परंतु हे काम अद्याप झालेले नाही आयुक्त साहेबांनी याकडे लक्ष देवून अबचलनगर भागातन नविन मलनिस्सारण लाईन टाकण्याच्या संदर्भात भाष्य करावे

**स.शेर अली** श्री सरजितसिंघ गिल यांची अबचलनगर भागातील जूनी चिनीमातीची मलनिस्सारण लाईन काढून त्या ठिकाणी नविन मलनिस्सारण लाईन टाकण्याची खुप दिवसापासून मागणी आहे.

**अ.सत्तार** सर्व नगरसेवकांच्या भावना लक्षात घेवून सर्व नगरसेवकाना पत्र देवून प्रस्तावात आपल्या प्रभागातील भाग राहिला असेल त्या भागाचे नांव देण्यासाठी कळविण्यात यावे. व त्यांचे भागाचा प्रस्तावात समावेश करण्यात यावा.

**आयुक्त** जेएनएनयूआरएम टप्पा-२ मधील तरोडा व कोठा, वसरणी, सिडको हडको, असदवन या भागातील पाणी पुरवठा व मलनिस्सारणाची ५३ टक्के कामे पुर्ण झालेले असून ४७ टक्के कामे बाकी आहे ही सर्व कामे पुर्ण झाल्यानंतर वसरणी, कोठा, असदवन, सिडको, हडको भागात राहिलेली कामे अटल मिशन अमृत योजनेत समाविष्ट करता येतील. ही योजना सन २०२२ पर्यत चालू राहणार आहे. सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून व सर्वाना विश्वासात घेवूनच अटल मिशन अमृत योजनेची कामे करण्यात येतील.

**अ.सत्तार** गोदावरी नदीत ड्रेनेजचे पाणी जात आहे त्याकडे लक्ष देण्यात येत नाही.

| | |
|---|---|
| **आयुक्त** | गोदावरी नदीत बोंढार येथील एसटिपी ड्रेनेजचे पाणी जात नाही. राष्ट्रीय नदी कृती आराखडा योजने अंतर्गत एमजीपी मार्फत गोदावरी नदी शुद्धीकरण प्रकल्पाचे काम करण्यात आलेले आहे. |
| **अ.सत्तार** | कत्तलखान्याचे घाण पाणी गोदावरी नदीत जात आहे. परभणी महानगरपालिकेने शहरात चालू असलेला कत्तलखाना बंद केलेला आहे.तशी वेळ या महागनरपालिकेवर येवू नये. आजच्या सभेच्या पुरवणी विषय पत्रिकेवर कत्तलखान्यास परवानगी देण्याचा विषय होता परंतु विरोधी पक्षनेत्याच्या मागणी नूसार पुरवणी विषय पत्रिका आजच्या सभेत घेण्यात येत नाही. लवकर लवकर या प्रस्तावावर निर्णय घेण्यात यावा. |
| **महापौर** | स.सदस्यांनी पुरवणी विषय पत्रिकेवरील विषयावर अभ्यास करण्यासाठी वेळ मागीतल्यामूळे पुरवणी विषय पत्रिका स्थगित ठेवण्यात आलेली आहे.स.सदस्यांनी या प्रस्तावावर अभ्यास करुन पुढच्या सभेत निर्णय घ्यावा |
| **अशोक उमरेकर** | कत्तलखान्याच्या प्रस्तावावर लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा. |
| **सरजिततसिंघ गिल** | श्री संजय मोरे यांच्या मान्यते शिवाय पाणी पुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येवू |
| **दिपकसिंह रावत** | श्री संजय मोरे यांच्या प्रभागात कामे करण्यासाठी महापौर व आयुक्तांना अधिकार देण्यात यावे. |
| **आयुक्त** | अटल मिशन अमृत योजना ही २०२२ पर्यत राहणार आहे त्यामूळे प्रस्तावातून एकादा भाग जरी राहिला तरी त्याचा दुस-या टप्यात समावेश करता येईल. |
| **महापौर** | या शासन निर्णयानुसार अमृत योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेस मान्यता देण्यात येते. तसेच योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग नांदेड मार्फत प्रकल्पाचे नियोजन, कार्यान्वयन, प्रर्यवेक्षण यंत्रणा म्हणून नेमण्यास मान्यता देण्यात येते.व याकामाची अमलबजावणी ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी तसेच शहरातील बराचसा भाग राहिलेला असल्यामूळे प्रशासनाचे वतीने सर्व नगरसेवकांना प्रस्तावित केलेल्या योजनेत आपल्या प्रभागातील काही भाग चुकीने राहिलेला असेल तर त्या भागाचा समावेश करण्यासाठी भागाचे नाव देण्यासाठी लेखी पत्र देण्यात यावे.स. सदस्यांनी कळविल्याप्रमाणे त्याचे भागाचा प्रस्तावाचा समावेश करुन त्यासह अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावे. |

**ठराव क्र.१३६** **ठराव**

विषय :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांच्या अंमलबजावणी बाबत.

संदर्भ :- नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे शासन निणर्य क्रं.अमृत-2015/प्र.क्र-197/नवी-33 दि.13.10.2015

नगर विकास विभागाच्या संदर्भीय शासन निणर्य अन्वये अमृत योजनेच्या अंमलबजाणी करीता मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेले आहे. या शासन निर्णयानुसार अमृत योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने प्रस्तावित केलेली खालील पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग नांदेड मार्फत प्रकल्पाचे नियोजन, कार्यान्वयन, प्रर्यवेक्षण यंत्रणा म्हणून नेमण्यात आले असून त्यास ही नांवाशमनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते, तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकडे पा.पू.व जनि विभागा अंतर्गत योजना राबविण्याच्या दृष्टीने अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंते, कनिष्ट अभियंते इ. सक्षम कर्मचारी वर्ग उपलब्ध असल्यामूळे खालील प्रस्तावित कामाची अमलबजावणी ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत करण्यासही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.



अ) पाणी पुरवठा प्रस्ताव

| S.No. | Project Name | Priority number | Year in which to be implemented | Year in which to be completed | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Additional Distribution Network for Nanded Water Supply Scheme for Universal coverage. | I | 2015-2016 | 2017-2018 | 17.60 Cr. |
| 2 | Consumer Metering, Rehabilitation H.S.C. and formation D.M.A.s for Nanded Water Supply Scheme | II | 2017-2018 | 2019-2020 | 73.00 Cr. |
| 3 | Augmentation of Distribution Network for Nanded Water Supply Scheme | III | 2017-2018 | 2019-2020 | 13.00 Cr. |
| 4 | Development of New Source on Upper Penganga Project and lifting Raw Water for Nanded Water Supply Scheme | IV | 2017-2018 | 2020-2021 | 260.00 Cr. |
| 5 | Rehabilitation of Pumping Station and WTP for Nanded Water Supply Scheme | IV | 2018-2019 | 2020-2021 | 8.50 Cr. |
| | | | | **Total** | **372.1** |

ब) मलनिस्सारण प्रस्ताव

| S.No. | Project Name | Priority number | Year in which to be implemented | Year in which to be completed | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Laying Sewerage Collection System with Pumping Station for universal Coverage of Nanded Sewerage SchemeA | I | 2016-17 | 2018-19 | 21.0 |
| 2 | Rehabilitation of SPS and collecting duct in Godavari River to stop Pollution into River under Nanded Sewerage Scheme | I | 2016-17 | 2017-18 | 5.0 |
| 3 | Rehabilitation of House Service Connections, Connecting Septic Tanks to Collection Sewerage Scheme | II | 2017-18 | 2018-19 | 15.00 |

| S.No. | Project Name | Priority number | Year in which to be implemented | Year in which to be completed | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Total | 41.00 |

एकूण (अ+ब): 413.10

शासन निर्णयात नमूद केल्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी व प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व या कामारीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास 3 टक्के इतके प्रकल्प व्यवस्थापन शुल्क देण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

तसेच प्रशासनाचे वतीने प्रस्तावित केलेल्या पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजनेसाठी काही भागात (गॅप) चुकीने राहिलेला आहे तो पुर्ण करण्यासाठी सर्व स. सदस्यांच्या शिफारस केलेल्या त्यांच्या प्रभागातील कामे समावेश करुन घेण्यात यावा व वरील DPR ची शासना मार्फत मान्यता प्राप्त झाल्यानंतर महासभे समोर पुनश्च ठेवण्यात यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत गोसावी समाजासाठी स्मशान भूमी निश्चित करणे बाबत.

**सुचक** :- विरेंद्रसिंध गाडीवाले **अनुमोदक** :- संजय मोरे

**विरेंद्रसिघ गाडीवाले** नविन पम्पींग स्टेशन जवळील जागा लिंगायत समाजाच्या स्मशानभूमी करीता देण्यात आलेली आहे त्याच जागे जवळील एक एकर जागा ही हिंदू समाजातील ज्या जातीमध्ये प्रेताचे दहन न करता दफन करण्यात येते अशा हिंदू धर्माकरीता देण्यात यावी जसे गोसावी समाजामध्ये प्रेताचे दहन न करता दफन करण्यात येते.तरी एक एकर जागा ही हिंदू दफन भूमी या नावाने जागा देण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे.



**महापौर** लिंगायत समाजाकरीता देण्यात आलेल्या जागेच्या बाजूलाच इतर समाजाच्या स्मशानभूमीकरीता जागा देण्यात आली तर दोन समाजामध्ये जातीय तेढ निर्माण होवून वाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामूळे दुस-या जागेचा विचार करण्यात यावा.

**शाम बन** नांदेड शहरात गोसावी समाजाचा करीता स्मशान भूमी नाही त्यामूळे डंकिन येथे लिंगायमत समाजा करीता देण्यात आलेल्या स्मशान भूमीच्या बाजूची एक एकर जागा गोसावी समाजाच्या स्मशान भूमीकरीता देण्यात यावी.

**अ.सत्तार** सभागृह मान्यता देत असेल तर त्यास काय अडचण आहे. प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**शेख बावजीर** लिंगायात समाजाकरीता असलेल्या स्मशान भूमीच्या बाजुची जागा गोसावी समाजाकरीता देण्यात यावी.

**विरेंद्रसिंध गाडीवाले** सर्व समाजाला स्मशान भूमी देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे.त्यामूळे गोसावी समाजालाही स्मशान भूमीकरीता जागा उपलब्ध्द करुन देण्यात यावी. अशी आमची मागणी आहे.

**स.शेर अली** गोसावी समाजाला स्मशानभूमीकरीता जागा देण्यात यावी.

**महापौर** लिंगायत समजाच्या स्मशान भूमी जवळ जागा निश्चित न करता गोसावी समाजाकरीता वेगळी जागा निश्चित करण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** लिंगायत समजाच्या स्मशान भूमीच्या बाजुला महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे किंवा नाही याबाबत मी मालमत्ता व्यवस्थापकाशी चर्चा केलेली आहे त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे. त्यामूळे लिंगायत समाजास देण्यात आलेली जागा सोडून तेथे शिल्लक असलेल्या महानगरपालिकेच्या जागेपैकी एक एकर जागा ज्या हिंदू धर्मातील समाजाकरीता दफनभूमीसाठी जागा देण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे त्यास सभागृहाने त्यास मान्यता द्यावी.

**आयुक्त** महानगरपालिकेचा ठराव, एमआरटिपी ऍक्ट मधील तरतूदी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी तपासून गोसावी समाजाकरीता स्मशान भूमी देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**फारुख अली खा** शहरातील सर्व मुस्लीम कब्रस्थानला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात आलेले परंतु मा. महापौर यांच्या प्रभागातील चैतन्यनगरातील आसरनगर भागातील कब्रस्थानला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात आलेले नाही, मी सरंक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठी अनेक दिवसापासून मागणी करीत आहे,

**महापौर** शासनाने अल्पसंख्याकरीता दिलेल्या निधीतून आसरानगर भागातील मुस्लीम कब्रस्थानला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली असून लवकरच संरक्षण भिंतीचे बांधकामासाठी निविदा मागवून काम पुर्ण करण्यात येईल.

**प्रविण चिखलीकर** सिडको भागातील मुस्लीम कब्रस्थानलाही संरक्षण भिंत नाही त्यामूळे सिडको भागातील मुस्लीम कब्रस्थानलाही संरक्षण भितीचे बांधकाम करण्यात यावे.

**महापौर** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते . आयुक्तांनी नियमानूसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १३७** **ठराव**

एमआरटिपी ऍक्ट १९६६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार नविन डंकिन येथे शिल्लक असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेपैकी एक एकर जागा ही हिंदू धर्मातील ज्या समाजात प्रेताचे दहन न करता दफन करण्यात येते अशा हिंदु धर्मातील समाजाकरीता दफनभूमीसाठी जागा निश्चित करुन देण्याची पुढील वैधानिक कार्यवाही आयुक्तांनी करावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अतर्गत नगरोत्थान योजने अंतर्गत प्रलंलिब कामे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- विरेंद्रसिंध गाडीवाले **अनुमोदक** :- संजय मोरे

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** नगरोत्थान योजनेतील रस्त्याची कामे निधी अभावी अर्धवट राहिलेली आहे.मित्रनगर मधील रस्ता अनेक वर्षापासून होत नाही त्याठिकाणी मलनिस्सारणाचे कामही होत नाही त्यामूळे नगरोत्थान योजनेतील अर्धवट

| | |
|---|---|
| | रस्त्याची कामे पुर्ण करण्यासाठी शासनास महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत किंवा प्राथमिक सुविधा, रस्ता विशेष अनुदान अंतर्गत अनुदान देण्यासाठी शिफारस करण्यात यावी.मित्रनगर रस्ता हा नगरोत्थान योजनेतून वगळण्यात यावा.व शासनाकडून मिळणा-या विविध योजनेंतील अनुदानातून या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात यावे. |
| **स.शेर अली** | आमच्या प्रभागात शासनाच्या दलित वस्ती सूधार योजने अंतर्गत कामे होत नाही इतरही शासनाच्या योजनेतून विकास कामे हाती घेण्यात येत नाही. केवळ नगरोत्थान योजनेतून रस्त्याची कामे करण्यास मान्यता देण्यात आली परंतु ती कामेही करण्यात आलेली नाही. मिल्लतनगरचा रस्त्याची हालत खुप खराब आहे. नागरीकांना रस्त्यावरुन चालणे अवघड झालेले आहे या रस्त्याचे काम त्वरीत करण्यात यावे. |
| **विश्वास कदम** | नगरोत्थान योजने अंतर्गत अर्धवट राहिलेली रस्त्याची कामे कोणत्या निधीमधून घेण्यात येणार आहे याचा खुलासा करण्यात यावा. |

**(१६)**

| | |
|---|---|
| **आनंद चव्हाण** | अत्यावश्यक विकास कामासाठी स्वतंत्र शिर्षक तयार करुन त्यासाठी स्वतत्र खाते उघडण्याची खुप दिवसापासूनची मागणी आहे. |
| **आयुक्त** | नगरोत्थान योजनेतील निधी अभावी अर्धवट रस्त्याची कामे पुर्ण करण्यासाठी लागणा-या खर्चाचा निधी शासनाकडून मागविण्यात यावा. जसा जसा निधी उपलब्ध्द होईल त्याप्रमाणे नगरोत्थान योजनेतील रस्त्याची कामे करता येतील. |
| **सरजितसिंघ गिल** | शहीद ए भगतसिंह या रस्त्याचे कामाचा समावेश जेएनएनयुआरएम योजनेत करण्यात आला होता जेएनएनयूआरएम योजनेचा पैसा शिल्लक असतांना शहीद ए भगतसिंह या रस्त्याचे काम करण्यासाठी निविदा का मागविण्यात आला नाही. शहरात इतर भागात करोडो रुपये खर्च करण्यात येतात परंतु शहीद ए भगतसिंह या रस्त्याची दुरुस्ती का करण्यात येत नाही. या रस्त्याकडे प्रशासनाचे लक्ष नाही काय हा शहरातील मुख्य रस्ता असुनही या रस्त्याचे काम का करण्यात येत नाही याचा खुलासा करण्यात यावा. |
| **रामनारायणजी काबरा** | शहीद भगतसिंघ रस्त्यावर मोठाले खडे पडल्यामूळे तो अत्यंत खराब झालेला आहे. वाहने चालविणे अवघड झाले आहे या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. |
| **फारुख हुसेन** | नगरोत्थान योजने अंतर्गत देगलूर नाका भागातील मिल्लतनगर रस्त्याचे काम हाती घेण्यात आले परंतु या रस्त्याचे अर्धवटच काम झालेले असून अर्धवट रस्त्यामूळे वाहतुकीस अडथळा येत आहे या रस्त्याचे काम केंव्हा पुर्ण होणार आहे. |
| **किशोर यादव** | वजिराबाद भागात जास्त वर्दळ असल्यामूळे या रस्त्यास पर्यायी रस्ता म्हणून तरोडेकर मार्केटच्या मागील रस्त्याचे काम नगरोत्थान योजने अंतर्गत घेण्यात आले होते परंतु या रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही. हा अत्यंत महत्वाचा रस्ता असल्यामूळे या रस्त्याचे काम हाती घेण्यात यावे. |
| **अ.सत्तार** | ब-याच कालावधी पासून शहरातील मुख्य रस्त्याची हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करण्यात आलेले नसल्यामूळे रस्त्याची वाताहत झालेली आहे.देगलूर नाका रस्ता, मिल्लतनगर रस्त्याची हालत खुप खराब आहे. आयुक्त साहेबाना विनंती आहे की शहरातील जे मुख्य रस्ते आहेत त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणासाठी लागणा-या खर्चाचे १० ते १५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करुन रस्ते अनुदान /विशेष रस्ता अनुदान अंतर्गत निधी मंजुर करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा. तसेच जिल्हा नियोजन विकास समिती नांदेड यांचेकडेही रस्ते दुरुस्तीसाठी अनुदान मंजुर करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात यावा. डिपीडिसीमध्ये महानगरपालिकेचे सदस्य असुन शासनाने या सदस्याना १ कोटीचा निधी दिलेला आहे, आम्ही आमचा डिपीडीसीचा एक कोटीचा निधी रस्ते दुरुस्तीसाठी देवू निधीसाठी डिपीडिसीकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. |
| **विरेंद्रसिघ गाडीवाले** | श्री अ.सत्तार यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझें अनुमोदन आहे. मुख्य रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी १०-१५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करुन शासनास रस्ता अनुदान / विशेष अनुदान अंतर्गत अनुदान देण्यासाठी विनती करण्यात यावी. |
| **स.शेर अली** | श्री अ.सत्तार यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. नगरोत्थान योजने अंतर्गत अर्धवट रस्त्याची कामे करण्यासाठी शासनास निधी देण्याची विनंती करण्यात यावी. |
| **गफार खान** | महानगरालिकेचे सदस्य डिपीडिसीचे मेंबर आहे त्यांनी डिपीडिसीमधून रस्ते दुरुस्तीकरीता निधी मिळविण्याचा प्रयत्न करावा. |
| **आयुक्त** | शहरातील मुख्य रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणासाठी लागणा-या खर्चाचे अदांजपत्रक तयार करण्यात येईल. |
| **अ,सत्तार** | नागपुरचे राज्यसभेचे खासदार नांदेड शहराच्या विकासासाठी रु.१.५० कोटीचा निधी दिलेला आहे त्याबध्दल त्याचे अभिनंदन करण्यात येते. |
| **प्रा.ललिता बोकारे (शिंदे)** | जूना मोंढा पुलावरील रस्ता व लातूर रोडवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ढवळे कॉर्नर हा रस्ता खुप खराब झालेला असून या रस्त्याची दुरुस्ती होणे आवश्यक आहे ती करण्यात यावी. |
| **महापौर** | यापुढे सभा चालू असतांना कोणत्याही विभाग प्रमुखांनी महापौरांच्या परवानगी शिवाय व्यासपिठावर येवू नये. |
| **आयुक्त** | श्री कदम का.अभियंता हे माहिती देण्यासाठी व्यासपिठावर आले होते त्याबध्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. |
| **सरजितसिंघ गिल** | शासन गुरुव्दाराच्या नावावर शहराच्या विकासासाठी कोटयावधी रुपये देते परंतु गुरुव्दारा परिसरातील शहिद ए भगतसिंघ रोडची दुरुस्ती करण्यात येत नाही.भगतसिंघ रोडच्या संदर्भात खुलासा करण्यासाठी अधिकारी येतात तर त्यांना बोलू देत नाही. भगतसिंघ रोडच्या दुरुस्तीकरीता निविदा का काढण्यात आलेला नाही याचा महापौरांनीच खुलासा करावा भगतसिंघ रोड पुर्ण मुर्दाड करुन टाकला तरी पण त्याची दुरुस्ती करण्यात येत नाही. नागपुरच्या खासदारानी निधी दिला तर उपकार केले का ज्यांना निधी मिळाला त्यांनी अभिनंदन करावे आम्ही कशाला अभिनंदन करावे. गुरु ता गद्दी मध्ये निधी मिळूनही कामे होत नाही. |

**(१७)**

**अ.सत्तार** जेएनएनयूआरएम योजनेचा निधी असतांना शहिद भगतसिंघ रोडच्या दुरुस्तीसाठी निविदा का काढण्यात आलेला नाही. हा शहरातील मुख्य रस्ता असुन या रस्त्याची दुरुस्ती आवश्यक आहे. शहरतील सर्व मुख्य रस्त्याची हॉटमिक्स पध्दतीने दुरुस्ती करण्यासाठी लागणा-या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन निधी मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा. नागपुर येथील राज्यसभेचे खासदारानी नांदेड शहराच्या विकास कामासाठी रु.१.५० कोटीचा निधी दिलेला आहे हा त्यांचा मोठेपणा आहे त्यामूळे त्यांचे आपण अभिनंदन करावयास पाहिजे यात काही गैर नाही.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** खासदारानी आपल्या खासदार निधीतून रु. १.५० कोटीचा निधी शहर विकास कामासाठी दिलेला आहे त्यामूळे त्यांचे अभिनंदन करण्यात यावे, रु. १.५० कोटीचा निधी महानगरपालिकेत जमा झालेला आहे.

**महापौर** आयुक्त साहेबांनी भगतसिंध रस्त्याची दुरुस्ती ज्या निधीतून करणे शक्य आहे त्या निधीतून दुरुस्ती करावी. तसेच शहरातील मुख्य रस्त्याचे हॉटमिक्स हॉटलेड पध्दतीने डांबरी करण करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन निधी मिळण्यासाठी प्रस्ताव शासनास व जिल्हा नियोजन व विकास समिती नादेड याचेकंडे सादर करण्यास मान्यता देण्यात येते

**ठराव क्र. १३८** **ठराव**

नांदेड शहरातील मुख्य रस्त्याची कामे ही १० मागील वर्षापुर्वी केलेली असून या रस्त्यावर जागो जागी खडे पडल्यामूळे रस्ते अत्यंत खराब झाल्याने नागरीकांना व वाहनचालकांना मोठा त्रास होत आहे. या सर्व मुख्य रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे , शासनाने स्थानिक संस्था कर रध्द केल्यामूळे सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती खुपच डबघाईस आल्याने महानगरपालिका आपल्या निधीतून शहरातील मुख्य रस्त्याची दुरुस्ती करु शकत नाही त्यामूळे नांदेड शहरातील मुख्य रस्त्याची व नगरोत्थान योजनेतील अर्धवट राहिलेल्या रस्त्यांची हॉटमिक्स हॉटलेड पध्दतीने दुरुस्ती करणेसाठी लागणारा अंदाजित रु. १०.०० कोटीचा निधी रस्ते अनुदान, विशेष रस्ता अनुदान,किंवा मुलभूत नागरी सुविधा अंतर्गत मंजुर करण्यासाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते महाराष्ट्र शासनास शिफारस करते. तसेच जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. दिवाकररावजी रावते, यांनाही नांदेड जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीतून नांदेड शहरातील प्रमूख रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी रु. १०.०० कोटीचे विशेष अनुदान मंजुर करण्यासाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते शिफारस करते.

**विषय क्र.१०** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी विभागाने परिपत्रक क्र.करवि/१२७२/२०१६ दि.२.१.२०१६ नुसार आरोग्य विभागामार्फत नागरीकांना देण्यात येणा- जन्म मृत्यू प्रमाणपत्र हे संबंधिताने मालमत्ता कराचा भरणा केल्यानंतर जन्म मृत्यू प्रमाणपत्र देण्या यावे अशा प्रकारचे परिपत्रक काढण्यात आलेले आहे, यामूळे नागरीकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्यामूळे सदरील परिपत्रकातून जन्म मृत्यू प्रमाण देण्याची बाब वगळण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- संजय गंगाधर मोरे **अनुमोदक** :- आनंद शंकरराव चव्हाण

**संजय मोरे** आयुक्त साहेबांनी दि.२.१.२०१६ रोजी एक परिपत्रक काढले यामध्ये मालमत्ता कर भरल्याशिवाय नागरीकांना जन्म मृत्यूचे प्रमाणपत्र देवू नये. जन्म मृत्यू सोडून इतर बाबीसाठी मालमत्ता कराची वसुली सक्तीने करावी त्यास आमचा विरोध नाही. परंतु जन्म मृत्यू हे अत्यावश्यक प्रमाणपत्र आहे ते नागरीकांना कोणतीही अट न ठेवता द्यावयास पाहिजे.एखाद्या कुटुंबात ४-५ भाऊ आहे ते त्यांच्या वडीलांच्या नांवावर असलेल्या घरात वेगवेगळे राहतात त्यापैकी एखादा भाऊ वारला तर त्यांच्या कुटुंबातील पत्नी मुलांना विविध कारणासाठी मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता असते तेव्हा अशा परिस्थितीत ते एकटे वडीलाच्या नांवावर असलेल्या घराचा मालमत्ता कर कसा भरतील.तसेच मुलांना तातडीने प्रवेशाकरीता नौकरीकरीता जन्माचे प्रमाणपत्राची आवश्यता असेल त्यांची मालमत्ता कर त्वरीत भरण्याची ऐपत नसेल अशा वेळी मुलांनी काय करावे म्हणून या परिपत्रकातून जन्म मृत्यू प्रमाणपत्राची अट काढून टाकण्यात यावी व उद्यापासून या ठरावाची अमलबजावणी करण्यात यावी.

**आनंद चव्हाण** सभागृहाने जो निर्णय धेतला त्याची अमलबजावणी आयुक्त साहेब करणार आहे काय का विखंडीतकरण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करणार आहे याचा खुलास करण्यात यावा.

**महापौर** शहरात विकासाची कामे करण्यासाठी वसुली वाढविणे आवश्यक असून मालमत्ता कराची वसुली वाढविण्यासाठी तीन महिण्याकरीता हे परिपत्रक काढण्यात आलेले आहे.

**शेख बावजीर** नागरीकांना मालमत्ता कराची रक्कम भरल्याशिवाय जन्म मृत्यू प्रमाणपत्र मिळत नसल्यामूळे नागरीक परेशान आहे. या प्रस्तावावर मतदान घेवून निर्णय धेण्यात यावा.

**उमेशसिंह चव्हाण** श्री संजय मोरे यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी .आयुक्त साहेब त्यांवर कार्यवाही करतील.

**आयुक्त** मला श्री संजय मोरे यांना विचारावयाचे आहे की, जन्म मृत्यू प्रमाणपत्राकरीता एखाद्या नागरीकांना त्रास दिला काय त्यांनी ते सांगावे.

**संजय मोरे** माझ्या प्रभागातील नामदेव गजभारे यांचे कॅन्सरच्या आजाराने दु:खद निधन झाले त्यांचे मुलांनी मृत्यू प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला आहे परंतु मालमत्ता कराची रक्कम भरल्याशिवाय मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येत नाही.

**आयुक्त** त्यांच्याकडे मालमत्ता कराची किती थकबाकी आहे व ती कोणत्या वर्षाची

**संजय मोरे** त्यांच्या १४ हजाराचा मालमत्त कर असुन तो चालू वर्षाचा आहे.



**आयुक्त** चालू वर्षाचा मालमत्ता कर १४ हजार असेल तर त्यांची खुप मोठी मालमत्ता आहे.यावरुन त्यांची मालमत्ता कर भरण्याची ऐपत असल्याचे दिसून येते.

**सरजितसिंघ गिल** श्री संजय मोरे यांनी मागील एक वर्षापासून सक्तीने मालमत्ता कर वसुल करण्यात येत असल्याचे सांगितले आहे आयुक्तांनी हे परिपत्रक २.१.२०१६ ला काढलेले आहे मग आपले अधिकारी बिगर परिपत्रकाचे एक वर्षापासून मालमत्ता कराची वसुली करीत आहे काय याचा खुलासा करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** आयुक्त साहेबांनी जे परिपत्रक काढले ते सभागृहासमोर स्थायी समिती समोर आले होते काय या परिपत्रकात कोणकोणत्या बाबी आहे हे आम्हाला कळू द्यावे.

**महापौर** मालमत्ता कर वसुलीची टक्केवारी वाढण्यासाठी हे परिपत्रक काढलेले आहे. वसुली झाली नाही तर विकासाची कामे कशी करता येइल. एखादा व्यक्ती खुपच गरीब आहे त्याची मालमत्ता कराचा भरणा करण्याची ऐपत नाही अशा करीता अट शिथिल करता येइल, सरसकट नियम शिथिल करणे बरोबर होणार नाही. तुमच्या प्रभागातील एखादी व्यक्ती खुप गरीब आहे त्यांचे जवळ पैसे नाही अशा बाबतीत आयुक्तांना शिफारस करता येईल एकच बाजू न बघता दुसरी बाजूही बधावी. महानगरपालिकेच्या हिताचाही विचार करावा.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आमच्याकडे काही नागरीक आले होते त्यांची आर्थिक परिस्थिती खुप बिकट होती वस्तुस्थिती आयुक्तांना सांगितले तर त्यांनी जन्म मृत्यू प्रमाणपत्र देण्याचे संबंधित विभागाला आदेशित केले.

**आनंद चव्हाण** मालमत्ता कराची किती वसुली येणे आहे त्यापैकी किती वसुली झाली वसुली वाढविण्यासाठी काय काय प्रयत्न केले,आज वसुलीची टक्केवारी किती आहे याचा माहिती देण्यात यावी.

**आयुक्त** ऐनवेळेस प्रश्न विचारण्यात आलेला आहे याची माहिती घेवून पुढील सभेत देण्यात येइल.

**महापौर** नागरीकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्यामूळे संबंधित नागरीकांची अडचण व परिस्थितीचा विचार करुन त्यांना जन्म मृत्यू देण्यात यावे, तसेच ज्या विद्यार्थ्याला शैक्षणिक कार्यासाठी, शाळेत महाविद्यालयात,उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी, नौकरीकरीता जन्माचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यांना विना अटी जन्माचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

**ठराव क्र.१३९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी विभागाने परिपत्रक क्र.करवि/१२७२/२०१६ दि.२.१.२०१६ नुसार आरोग्य विभागामार्फत नागरीकांना देण्यात येणा- जन्म मृत्यू प्रमाणपत्र हे संबंधिताने महानगरपालिकेचा मालमत्ता कराचा व पाणी पटीचा भरणा केल्यानंतर जन्म मृत्यू प्रमाणपत्र देण्या यावे अशा प्रकारचे परिपत्रक काढण्यात आलेले आहे, यामूळे नागरीकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्यामूळे संबंधित नागरीकांची अडचण व परिस्थितीचा विचार करुन त्यांना जन्म मृत्यू देण्यात यावे ,तसेच ज्या विद्यार्थ्याला शैक्षणिक कार्यासाठी, शाळेत महाविद्यालयात, उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी, नौकरीकरीता जन्माचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यांना विना अट जन्माचे प्रमाणपत्र देण्यात यावे, असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.११** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरनपालिका क्षेत्रातील डिपीआर-१ ते डिपीआर-११ मधील डिपीआर-३ वगळता केंद्र शासनाच्या सीएसएमसी (CSMC) ने एकूण १९६४० धरकुल संख्या अंतिम करुन मार्च २०१७ पर्यत पुर्ण करावयाचे आहे. केंद्र शासनाच्या मंजुरीनूसार डिपीआर व झोपडपटटी निहाय महानगरपालिकेने काम पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिका हध्दीतील कोण्त्या झोपडपटी वस्तीमध्ये किती घरकुल संख्या Freezeout केलेली आहेत व त्या सबंधित वस्तीमध्ये झोपडपटटी निहाय किती घरकुलाचे मार्कआवूट झाले किती घरकुल पुर्ण झाले आहेत व उर्वरीत घरकुलाची प्रगती काय आहे याबाबतचा सविस्तर अहवाल आज पर्यतच्या आर्थिकस्थितीसह सर्वसाधारण सभेसमोर जाहिर वाचन करुन सभागृहामध्ये त्यामध्ये चर्चा करुन निर्णय घेण्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देते.

**सुचक :-** संजय गंगाधर मोरे **अनुमोदक**:- अ.सत्तार अ.गफुर, आनंद चव्हाण

**अंजली गायकवाड** चार पाच वर्षापुर्वी ब-याचश्या नागरीकांनी घराचे बांधकाम करुन देण्यासाठी पैसे भरलेले असून त्यांचेकडे पैसे भरल्याच्या पावत्या आहेत परंतु त्यांना अद्याप घरे देण्यात आलेली नाहीत भरलेले पैसेही परत करण्यात आलेले नाहीत.

**आयुक्त** मी महानगरपालिकेत आयुक्त म्हणून रुजू झाल्यानंतर जवळपास ४५० नागरीकांचे पैसे परत केलेले आहेत. ज्याना पैसे परत मिळाले त्यांनी लेखी अर्जासोबत पैसे भरल्याची पावती जोडून संबंधित विभागास अर्ज द्यावा त्यांना पैसे परत करण्यात येतील.

**आनंद चव्हाण** ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने अंतर्गत मुलभूत सुविधा देण्याचे कंत्राट मे.पंदे कन्स्ट्रक्शन कंपनीस देण्यात आले होते परंतु लेखी पत्राव्दारे डिपीआर नुसार काम पुर्ण करु शकत नसल्याची असमर्थता दाखवून सदरचे काम सोडत असल्याचे सदर कंपनीने कळविले होते.असे असतांना पंदे कंपनीस पुन्हा कामे का देण्यात येत आहे.

**आयुक्त** अद्याप हे प्रकरण माझ्याकडे आलेले नाही. मंजुर दरावर संबंधीताकडून काम करुन घेण्यात येत आहे.



**गफार खान** श्री सुशिल खोडवेकर साहेब रुजू झाल्यापासून डिसेंबर २०१५ पर्यत विविध भाषेत बिएसयुपीच्या कामा संदर्भात आयुक्त साहेबांना व संबंधित विभाग प्रमूखाला पत्र दिलेले आहे.बिएसयुपीचा अर्थ असा आहे की, Basic services urban persion नागरी भागातील गरीब नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा पुरविणे,याच उध्देशान केंद्र शासनाने हि योजना सुरु केलेली आहे. माझ्या प्रभागात बिएसयुपी योजने अंतर्गत ४१० घरे मंजुर होती त्यापैकी ३९८ घरांचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. काही घरांना ड्रेनेज कनेक्शन देण्यात आलेले नाही, आरसीसी नाल्याचे व रस्त्याची कामे प्रलंबित आहे, मा.महापौरांनी बिएसयुपीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी सबंधित नगरसेवकांची बैठक घेतली होती या बैठकीस आयुक्त व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख, बिएसयुपी विभागाचे अभियंते उपस्थित होते.बैठकीत नगरसेवकांनी बिएसयुपीचे होत असलेल्या कामांच्या संदर्भात आपल्या समस्या मांडल्या होत्या मीही दुलेशाह रहेमान नगरातील समस्या मांडल्या होत्या, झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात त्याची नोंद आहे त्यावेळी मला असे सांगण्यात आले की,लाभार्थ्यानी आपला वाटा भरल्यानंतर त्यांना मुलभूत नागरी सुविधा देण्यात येतील सहा महिणे झाले परंतु अद्याप त्याची अमलबजावणी झालेली नाही,सहा महिण्यापासुन मी आयुक्त साहेबाना निवेदने दिली त्यावर आयुक्त साहेबांनी अर्जन्ट पुट अप असे शेरे लिहिलेले आहे परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, पैसे शिल्लक असतांना मुलभूत नागरी सुविधाची कामे का करण्यात आलेले नाही ,श्री संजय मोरे यांनी जो प्रस्ताव ठेवला त्याबध्दल त्याचे मी अभिनंदन करतो त्यामूळै मला सभागृहात आम्हाला बोलण्याची संधी मिळालेली आहे. आता आम्हाला असे समजले आहे की,बिएसयुपीची योजना बंद झालेली आहे त्याचे युटीलायजेशन प्रमाणपत्रही शासनास सादर करण्यात आलेले आहे. केंद्र व राज्य शासनाचे योजना बंद करण्याचे जे परिपत्रक आलेले आहे ते स्थायी समितीच्या सर्वसाधारण सभेच्या का नजरेस आणलेले नाही. आयुक्त साहेबांनी यापुर्वी सांगितले की , या सभागृहात स्थायी समितीत जे निर्णय होतात तेच औपचारीक निर्णय असतात, महापौरांनी जी बैठक घेतली होती ती शौभेसाठी टाईमपास म्हणून घेतली होती काय महापौरांनी याबाबत खुलासा करावा व बांधकाम करण्यात आलेल्या घराच्या परिसरात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी आयुक्ताना आदेशीत करावे.

**महापौर** बिएसयुपीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी सर्व संबंधित नगरसेवकासह बिएसयुपी विभागाचे प्रमुख व त्याचे अभियंत्यासह बैठक घेतली होती या बैठकीस आयुक्त साहेबही उपस्थित होते. बैठकीत स.सदस्यांनी बिएसयुपीच्या कामांच्या संदर्भात ज्या समस्या मांडल्या होत्या त्याची दखल घेवून त्यावर पुढील कार्यवाही

करण्यासाठी आयुक्त साहेबांना निर्देष दिलेले होते. समस्याचे निराकरण करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे असे मला वाटते. यासंदर्भात आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**डॉ.करुणा जमदाडे** महापौरांनी बिएसयुपीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी जी बैठक धेण्यात आली त्या बैठकीत मी राहुलनगर व वाघाळा भागातील दोन रस्त्याची कामे सुचविली होती त्यापेकी एका रस्त्याचे काम करुन देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते परंतु आज पर्यत एकाही रस्त्याचे काम मार्गी लागलेले नाही.

**आयुक्त** केंद्र शासनाच्या बिएसयुपी योजने अंतर्गत ११ डिपीआरमध्ये एकूण २७९८५ घरे मंजुर होती त्यापैकी १८८०१ घरांना मार्क आवूट देण्यात आले होते त्यापैकी १७००० घराचे बांधकाम पुर्ण करण्यात आले व १८०१ घराचे बांधकाम प्रगती पथावर आहे. सध्या बांधकाम करण्याचे एकही घर शिल्लक नाही.सविस्तर आर्थिक अहवाल उपलब्ध्द नाही त्यबध्दल मी दिलगिरी व्यक्त करतो,याकरीता वेळ देण्यात यावा. बिएसयुपी योजनेतील घराचे बांधकामासाठी केंद्र शासनाचे अनुदान रु. ५६४.७१ कोटी होते त्यापैकी रु. ५६४.३३ खर्च झाले, राज्य शासनाचे रु. ९४.२४ कोटी होते त्यापेकी रु. १०३.७८ कोटी खर्च झाले महानगरपालिकेचा रु. १४.४७ कोटी सहभाग नोंदवावयाचा आहे. लाभार्थ्याचा सहभाग रु. ५४.१४ कोटीचा होता त्यापैकी लाभार्थ्यानी फक्त २०.२७ कोटीचा सहभाग नोंदविलेला आहे. इन्फ्राची कामे करण्याकरीता करीता ८ ते १० टक्के जास्तीचे दराच्या निविदा मंजुर करण्यात आल्या तसेच लाभार्थ्यानी आपल्या हिश्याची रक्कम भरण्यास दाखविलेली अनास्था महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीमूळे महानगरपालिकेच्या निधीतून ही कामे करणे शक्य नसल्यामूळे इन्फ्राची कामे थांबविण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने बिएसयुपीची योजना बंद केल्याने राज्यशासनाच्या व केद्रं शासनाच्या आदेशाप्रमाणे, आहे त्या परिस्थितीत कामे अंतिम करुन केंद्र शासनास युटीलायजेशन प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

**संजय मोरे** बिएसयुपी योजनेतील १९ हजार घराचे बांधकाम केले म्हणून राज्य शासनाने त्यांना पुरस्कार दिला ,राज्य शासनाने पुरस्कारी दिल्यामूळे आयुक्त साहेबांचा आपण सत्कार केला, बिएसयुपीचे कामाना महासभेने वेळोवेळी ठराव घेवून मंजुरी दिलेली आहे. प्रशासनाचे काम होते की जेव्हा शासनाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस पुरस्कार जाहिर केला आणि तो पुरस्कार घेण्यासाठी महापौर ,उपमहापौर, सभापती, सभागृहनेते, विरोधीपक्ष नेते यांना घेवून जावयस पाहिजे होते परतु महापौर ,उपमहापौर, सभापती, सभागृहनेते, विरोधीपक्ष नेते विचारणा करण्यात आले नाही एकटे जावून पुरस्कार घेवून आले, हा महापौर



उपमहापौरांचा अवमान नाही काय फक्त प्रशासनानेच चांगली कामे केली नगरसेवकांनी कामे केली नाही काय पुरस्कार घेताना महापौर, उपमहापौर यांचाही पेपरमध्ये एखादा फोटो आला असता,

**महापौर** प्रशासनाने पदाधिका-यांना पुरस्कार धेण्यासाठी जात असल्याचे सांगावयास पाहिजे होते. पेपरमध्ये बातमी प्रसिध्द झाल्यानंतर आम्हाला कळाले की, नांदेड वाघाळा शहर महागनरपालिकेस शासनाचा पुरस्कार मिळाला.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आयुक्त साहेबांनी खुलासा करावा शासनाने कशासाठी निमंत्रण दिले होते तेथे गेल्यानंतर काय घडले याची पुर्ण माहिती द्यावी.

**आयुक्त** केंद्र शासनाने जाहिर केलेल्या सर्वासाठी घरे या योजनेची प्रत्यक्षात अमलबजावणी कशी करावयाची याकरीता शासनाने राज्यातील आयुक्ताकरीता कार्यशाळेचे आयोजन केले होते.या कार्यशाळेस राज्यातील वेगवेगळया महानगरपालिकेचे आयुक्त आले होते ज्या महानगरपालिका हध्दीत बिएसयुपी योजना आंहे त्या महानगरपालिकेच्यास आयुक्तांनी कार्यशाळेत बिएसयुपी योजनेची अमलबजणी कशी केली याचे सादरीकरण केले (प्रेझेन्टेशन) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने बिएसयुपी योजनेच्या कामाची १५ मिनिटाची सिडी तयार केली होती ती दाखविण्यात आली तेव्हा केद्रं शासनाच्या मंत्री महोदयांनी नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेने बिएसयुपी योजने अंतर्गत केलेल्या कामाचे कौतूक करुन उत्स्फूर्तपणे आमचे पूष्पगूच्छ देवून सत्कार केलेला आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** आपणास कार्यशाळेस उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण होते पुरस्कार स्विकारण्यासाठी नव्हते फक्त बिएसयुपीच्या कामाचे कौतूक करुन मंत्री महोद यांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला एवढेच आहे ना

**आयुक्त** श्री संजय मोरे यांनी आयुक्त पुरस्कार घेण्यासाठी महानगरपालिकेतील पदाधिका-यांना घेवून गेले नाही असा आरोप केला तो चुकीचा असून सभागृह, महापौर व पदाधिका-यांचा अवमान आहे तो त्यांनी परत घ्यावा. मुळात पुरस्कार स्विकारण्यासाठी निंमत्रण नव्हतेच, श्री संजय मोरे यांनी जे सांगितले त्यामूळे मला वस्तुस्थिती सभागृहात सांगता आली व एकमेकाच्या मनात निर्माण झालेले गैरसमज दुर झाले.

**गफार खान** सभागृहास विनंती आहे की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून तिन तिन वेळेस अधिका-यांना पदोन्नती देण्यात येते त्याच धर्तीवर बिएसयुपी योजनेच्या लाभार्थ्याकडून त्यांच्या सहभागाची वसुली होइल या अपेक्षेवर माझ्या प्रभागातील इन्फ्राची शिल्लक कामे पुर्ण करण्यासाठी महापौरांनी आयुक्तांना निर्देश द्यावेत. श्री अंधारे साहेब लार्भायाकडून सहभागाची रक्कम वसुल करीत आहे आम्हीही त्यांना सहाकार्य करीत आहोत. श्री संजय मोरे यांनी आरोप केला की. आयुक्त साहेबांचे काम नव्हते काय महापौर, उपमहापौर यांना पुरस्कार घेण्यासाठी घेवून जावयाचे परंतु पुरस्कार स्विकारण्यासाठी कोणाला निमंत्रण द्यावयाचे कोणाला नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो, उगाच आयुक्तांची कोंडी करुन त्यांचा अवमान करावयाचा हे बरोबर नाही. स. सदस्यांनी यापुढे असे वक्तव्य करु नये.

**उमेशसिंह चव्हाण** लोकप्रतिनिधी व प्रशासन हे महानगरालिका विकासाची दोन चाके असून दोन्ही चाके सारखी चालली तरच विकासाची गाडी व्यवस्थीत चालू शकते असे मला वाटते. सन २००५ ला केंद्र शासनाने बिएसयुपी योजने २२५ चौ.फुटाचे आकाराचे धराचे योजनेस मान्यता दिली होती त्यावेळे महानगरपालिकेतील अभियंत्यानी या सर्व घराचे नकाशे कोणत्याही खाजगी वास्तुशास्त्रज्ञाची मदत न घेता स्वतः तयार करुन तातडीने ते केंद्र शासनास सादर केले त्यानुसार शासनाने त्यावेळी ५००० घराचे बांधकामास मंजुरी दिली त्यानंतर पुन्हा शासनाने योजनेत बदल करुन २६९ चौ. फुटाचे बांधकाम करण्यास मान्यता दिली त्यावेळीही महानगरपालिकेतील अभियंत्यानी या सर्व घराचे नकाशे कोणत्याही खाजगी वास्तुशास्त्रज्ञाची मदत न घेता स्वतः तयार केले होते व २६ हजार धराची मंजुरी प्राप्त करुन ते गोर गरीब नागरीकांना उपलबध्द करुन

दिले, बिएसयुपी योजना यशस्वीरित्या पुर्ण करण्यास बिएसयुपी विभागातील उपआयुक्त, का.अभियंता उपअभियंता कनिष्ठ अभियंता,यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे त्यांनी या योजनेत खुप मेहनत घेतलेली असल्यामूळे त्यांना एक अतिरिक्त वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे.

**संजय मोरे** ऑक्टोबर २०१२ ला २११७१ घरे मंजुर होती १९६४० घरे फ्रिज आवूट केले म्हणजे अंतिम रेखांकर केले त्यापेकी एकूण १८८०१ धरांना मार्क आवूट दिलेले असून १५०० घराचे बांधकाम शिल्लक आहे.

**आयुक्त** सध्या मार्क आवूट दिलेले एक ही घराचे बांधकाम करण्याचे शिल्लक नाही,आपणास जे शिल्लक घरे दिसून येत आहे त्या घराचा बहुमजली इमारती समावेश आहे. कृपया सभागृहाचा गैरसमज करण्यात येवू नये. श्री अधारे कार्यकारी अभियंता आपणास घराची सविसतर माहिती देतील.

**का.अभियंता बिएसयुपी** केंद्र शासनाने बिएसयुपी योजने अंतर्गतची घरकुले व त्या प्रमाणातील मुलभूत सुविधांचा निधी दि. ११.११.२०१४ च्या बैठकीमध्ये कपात केला, सदर बैठकीमध्ये एकूण मंजुर २७९८५ घरकुलापैकी ३२०९ घरकुल १ ते १० प्रकल्पामध्ये रध्द केले त्या अगोदर एनटिसी मिल प्रकल्प ५१३६ घरकुलाचा जागे अभावी केंद्र शासनाने दि.९.९.२०१४ रोजीच्या बैठकीमध्ये रध्द केले म्हणून एकूण मंजुर घरकुलापैकी १९६९० घरकुलाचे उदिष्ट देण्यात आले त्यांतरही सदर उदिष्टामध्ये बदल झाला असून डिपीआर १ ते १० मधील

**(२१)**

२४३ घरकुले व ब्रम्हपुरी डिपीआर ११ मधील ५९६ घरकुले असे एकूण ८३९ घरकुल व प्रमाणामध्ये मुलभूत सुविधाचा निधी रध्द करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण सुधारीत अंतिम उदिष्टानुसार १८८०१ घरकुले व त्या प्रमाणात मुलभूत सुविधाचे कामे करणे आहे.

**संजय मोरे** सध्या १५०० घराचे बांधकाम शिल्लक आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे आम्ही चार ठराव करुन दिले ज्या प्रभागात नागरीक राहतो तेथे घर मिळत नसेल तर दुस-या प्रभागात त्याला घर बांधून देण्यात यावे. आवश्यकते जेथे जेथे घरे देता येईल त्याप्रमाणे नागरीकांना शिल्लक घराचे इन्फ्रा सहीत बांधकाम करुन देण्यात यावे अशा प्रकारचे ठराव आम्ही करुन दिलेले आहे.त्याप्रमाणे नागरीकांना शिल्लक घराचे बांधकाम करुन देण्यात यावे अशी आमची मागणी आहे.

**आयुक्त** सध्या एकाही घरांचे बांधकाम शिल्लक राहिलेले नसुन आता केंद्र शासनाने बिएसयुपी योजना बदं केलेली असल्यामूळे आता आपण घराचे बाधकाम करु शकत नाही, जे नागरीक घरासाठी वंचित आहेत त्यांना अटल अमृत मिशन मध्ये प्राधान्य देण्यात येईल.अशीच सर्व सभागृहाची भावना आहे.

**महापौर** प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या अहवालाची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्र. १४०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरनपालिका क्षेत्रातील डिपीआर-१ ते डिपीआर-११ मधील डिपीआर-३ वगळता केंद्र शासनाच्या सीएसएमसी (CSMC) ने एकूण १९६४० धरकुल संख्या अंतिम करुन मार्च २०१७ पर्यत पुर्ण करावयाचे आहे. केंद्र शासनाच्या मंजुरीनूसार डिपीआर व झोपडपटटी निहाय महानगरपालिकेने काम पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिका हध्दीतील कोण्त्या झोपडपटी वस्तीमध्ये किती घरकुल संख्या Freezeout केलेली आहेत व त्या सबंधित वस्तीमध्ये झोपडपटटी निहाय किती घरकुलाचे मार्कआवूट झाले किती घरकुल पुर्ण झाले आहेत व उर्वरीत घरकुलाची प्रगती काय आहे याबाबतचा आर्थिकस्थितीसह सविस्तर अहवाल खालील प्रमाणे सभागृहासमोर ठेवण्यात आला त्याची नोंद ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

**<u>अहवाल</u>**

केंद्र शासनाने बिएसयुपी योजने अंतर्गतची घरकुले व त्या प्रमाणातील मुलभूत सुविधांचा निधी दि.११.११.२०१४ च्या बैठकीमध्ये कपात केला,सदर बैठकीमध्ये एकूण मंजुर २७९८५ घरकुलापैकी ३२०९ घरकुल १ ते १० प्रकल्पामध्ये रद केली त्या अगोदर एनटिसी मिल प्रकल्प ५१३६ घरकुलाचा जागे अभावी केंद्र शासनाने दि.९.९.२०१४ रोजीच्या बैठकीमध्ये रध्द केला म्हणून एकूण मंजुर घरकुलापैकी १९६९० घरकुलाचे उदिष्ट देण्यात आले त्यांतरही सदर उदिष्टामध्ये बदल झाला असून डिपीआर १ ते १० मधील २४३ घरकुले व ब्रम्हपुरी डिपीआर ११ मधील ५९६ घरकुले असे एकूण ८३९ घरकुल व प्रमाणामध्ये मुलभूत सुविधाचा निधी रध्द करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण सुधारीत अंतिम उदिष्टानुसार १८८०१ घरकुले व त्या प्रमाणात मुलभूत सुविधाचे कामे करणे आहे.

केंद्र शासनाच्या बिएसयुपी योजनेतील घराचे बांधकामासाठी केंद्र शासनाचे अनुदान रु.५६४.७१ कोटी होते त्यापैकी ५६४.३३ खर्च झाले ,राज्य शासनाचे रु.९४.२४ कोटी होते त्यापेकी १०३.७८ कोटी खर्च झाले, महानगरपालिकेचा १४.४७ कोटी सहभाग नोंदवावयाचा आहे. लाभार्थ्याचा सहभाग रु.५४.१४ कोटी होती त्यापैकी लाभार्थ्यांनी फक्त २०.२७ कोटी चा सहभाग नोंदविलेला आहे.

**विषय क्र.१२** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिका २०१५-२०१६ करीता मालमत्ताधारकाना मालमत्ता कराचे मागणी बिल ई-गर्व्हनन्स व्दारे नव्याने अमलबजावणी करण्यात येत असल्याने मालमत्ताधारकाना मागणी बिल मिळण्यास वेळ लागला त्यामूळे जे मालमत्ताधारक १० फेब्रुवारी २०१६ पुर्वी मागील मालमत्ता कर व पाणी पटी कराची थकबाकी भरतील त्याना ५० टक्के शास्तीत सुट देण्यास व तसेच सन २०१५.२०१६ चालू आर्थिक वर्षाचा यासंपर्ण मालमत्ता कराचा व पाणी पटी कराचा भरणा करतील त्यांना १०० टक्के मालमत्ता कराची पाणी पटीकराची शास्ती माफ करण्यास मान्यता देण्यात आली होती परंतु या योजनेची मोठया प्रमाणात जाहिरात झालेली नसल्यामूळे ब-यावश्या मालमत्ताधारकांना माहिती मिळाली नसल्यामूळे मालमताधारकांनी योजनेची मुदतवाढ करण्याची मागणी केली असून या योजनेस मालमत्ताधारकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्यामूळे शास्तीमाफीच्या योजनेस मुदतवाढ करण्यास मान्यता देणे बाबत.

**सुचक**:- विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- संजय मोरे

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** शास्ती माफीच्या योजनेस ३१ मार्च २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात यावी.

**महापौर** शास्ती माफीच्या योजनेस ३१ मार्च २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१४१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरालिका २०१५-२०१६ करीता मालमत्ताधारकाना मालमत्ता कराचे मागणी बिल ई-गर्व्हनन्स व्दारे नव्याने अमलबजावणी करण्यात येत असल्याने मालमत्ताधारकाना मागणी बिल मिळण्यास वेळ लागला त्यामूळे जे मालमत्ताधारक १० फेब्रुवारी २०१६ पुर्वी मागील मालमत्ता कर व पाणी पटी कराची थकबाकी भरतील त्याना ५० टक्के शास्तीत सुट देण्यास व तसेच सन २०१५.२०१६ चालू आर्थिक वर्षाचा यासंपर्ण मालमत्ता कराचा व पाणी पटी कराचा भरणा करतील त्यांना १०० टक्के मालमत्ता कराची पाणी पटी कराची शास्ती माफ करण्यास मान्यता देण्यात आली होती परंतु या योजनेची मोठया प्रमाणात जाहिरात झालेली नसल्यामूळे ब-यावश्या मालमत्ताधारकांना माहिती मिळाली नसल्यामूळे मालमताधारकांनी योजनेची मुदतवाढ करण्याची मागणी केली असून या योजनेस मालमत्ताधारकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्यामूळे शास्तीमाफीच्या योजनेस दि.३१ मार्च २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**पुरवणी विषय पत्रिका**

**महापौर** — सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आयुक्तांनी सादर केलेला पुरवणी विषय पत्रिकेवरील विषय क्र.७ सभागृहासमोर निर्णयासाठी ठेवण्यात येत आहे. त्यावर सभागृहाने निर्णय घ्यावा.

**आनंद चव्हाण** — शासन निर्णया नुसार प्रभाग क्र. ५ मध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्यासाठी महानगरपालिकेच्या 50% हिश्याची रक्कम रु. 2.10 कोटी महानगरपालिकेत निधी वर्ग करुन कामे हाती घेण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** — प्रभाग क्र. ५ मध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्यासाठी रु. ४.२० कोटीच्या रक्कमेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सरजितसिंघ गिल** — शासनाने प्रभाग क्र.५ मध्ये विकास कामासाठी मान्यता दिलेली असल्यामूळे प्रशासनाचे प्रस्तावा मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

**विषय क्र. ७**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग,शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -2015/ प्र.क्र. 80/ नवि-16 तंत्रालय, मुंबई-32 दिनांक 17 नोव्हेंबर 2015 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील महानगरपालिकाक्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत ``प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी`` महानगरपालिकेस रु.2.10 कोटी वितरीत करण्यात आले असुन महापालिकेचा तेवढाच सहभाग रु. 2.10 कोटी असे एकुण रु.4.20 कोटी रक्कमेतुन मुलभुत सोई सुविधा पुरविणे अंतर्गतची कामे प्रस्तावित करण्यात येत असुन शासन निर्णय क्र. जीईएन-2008/ प्र.क्र.08/ नवि-16 मुंबई 32 दिनांक 29 ऑगष्ट 2008 नुसार जिल्हास्तरीय समितीकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. मुलभूत संविधाच्या विकासाठी रु.4.20 कोटीच्या प्रस्तावित कामाच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी मार्फत जिल्हास्तरीय समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यास व शासन निर्णय नुसार महानगरपालिकेच्या 50 % हिश्याची रक्कम रु.2.10 कोटी महानगरपालिकेत निधी उपलब्धते नुसार वर्ग करुन प्राधाण्याने कामे हाती घेण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महापौर** — आयुक्तांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र. १४२** — **ठराव**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग,शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -2015/ प्र.क्र. 80/ नवि-16 तंत्रालय, मुंबई-32 दिनांक 17 नोव्हेंबर 2015 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील महानगरपालिकाक्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत ``प्रभाग क्र. 5 मध्ये मुलभुत सुविधा विकास कामे करण्यासाठी`` महानगरपालिकेस रु.2.10 कोटी वितरीत करण्यात आले असुन महापालिकेचा तेवढाच सहभाग रु. 2.10 कोटी असे एकुण रु.4.20 कोटी रक्कमेतुन मुलभुत सोई सुविधा पुरविणे अंतर्गतची कामे प्रस्तावित करण्यात येत असुन शासन निर्णय क्र. जीईएन-2008/ प्र.क्र.08/ नवि-16 मुंबई 32 दिनांक 29 ऑगष्ट 2008 नुसार जिल्हास्तरीय समितीकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. करीता मुलभूत सोई सुविधांचा विकासाठी रु.4.20 कोटीच्या प्रस्तावित कामाच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी मार्फत जिल्हास्तरीय समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते, तसेच उपरोक्त शासन निर्णया नुसार महानगरपालिकेच्या 50 % हिश्याची रक्कम रु.2.10 कोटी महानगरपालिकेत निधी वर्ग करुन कामे हाती घेण्यासाठी ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** — पुरवणी विषय पत्रिका स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने आजच्या सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर करण्यात येते, शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येईल.
शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव,** | **महापौर,** |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | .नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |